सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १४३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## साई बाबांचा प्रसाद महागला!

अहिल्यानगर: शिर्डीच्या साईबाबांच्या दर्शनाला दररोज लाखों भाविक शिर्डीत येतात. साईबाबांचे दर्शन घेऊन घरी जाताना प्रत्येकजण शिर्डीचा प्रसाद सोबत घेऊन जातात. शिर्डी संस्थानच्यावतीने प्रसाद म्हणून लाडू विक्री केली जाते. भाविक हे लाडू आवडीने खरेदी करतात, साधारण २० रुपयामध्ये २ लाडू असलेले पाकीट भाविकांना प्रसाद स्वरूपात दिला जातो. याद्वारे भाविक हवे तितके लाडू घरी घेऊन जाऊ शकतात. मात्र, आता या लाडूंचे दर महाग करण्यात आले आहेत. साईबाबा संस्थानने नुकतेच प्रसाद लाडूचे दर वाढवत ३० रुपये केले आहेत.

शिर्डीचे लाडू देशभरात प्रसिद्ध असून, साईबाबां संस्थानकडून भाविकांना देण्यात येणारा हा प्रसाद आता महाग करण्यात आला आहे. साईबाबा संस्थानच्या या निर्णयावर अनेक भाविक नाराज असून. यापूर्वी २० रुपयाला मिळणाऱ्या या प्रसादाला ३० रुपये मोजावे लागणार आहे. संस्थानच्या या निर्णयामुळे भाविकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडणार आहे. भाविकांच्या देणग्यांवर चालणाऱ्या विश्वस्त संस्थेने असा व्यावसायिक दृष्टिकोन ठेवावा का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

संस्थानकडून मिळालेल्या माहितीनुसार, दर्शनानंतर मोफत वाटल्या जाणाऱ्या बुंदी प्रसादामुळे होणारा तोटा भरून काढण्यासाठी ही दरवाढ करण्यात आली आहे. मात्र हा तोटा भाविकांकडूनच वसूल करणे योग्य आहे का? असाही सवाल जनसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.

## तुरुंगात गेल्यास पीएम सीएमना हटवणाऱ्या विधेयकाप्रकरणी विरोधकांचा रडीचा डाव

नवी दिल्ली : गंभीर गुन्ह्याप्रकरणी किमान ३० दिवस तुरुंगात घालवले किंवा तशी कोठडी देण्यात आली तर संबंधित मंत्री आपोआप पदमुक्त होईल अशी तरतूद असलेले विधेयक केंद्र सरकारने तयार केले आहे. या विधेयकात पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांनाही गंभीर गुन्ह्याप्रकरणी तुरुंगात गेल्यास आपोआप पदमुक्त करण्याची तरतूद आहे. तुरुंगातून सरकार चालवण्याचा प्रकार घडू नये यासाठी तरतुदी केलेले हे विधेयक केंद्र सरकारने लोकसभेत ठराव मंजूर करुन संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. आता विधेयकावर साधकबाधक चर्चा करण्याची संधी असताना विरोधक संयुक्त संसदीय समितीवर बहिष्कार टाकत आहेत.

यामुळे स्वतःच्या गुन्हेगारी प्रकरणात अडकलेल्या नेत्यांना वाचवण्यासाठी विरोधक रडीचा डाव खेळत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. आम आदमी पार्टी, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पार्टी यांनी गंभीर

गुन्ह्याप्रकरणी तुरुंगात गेल्यास पीएम सीएमना हटवणाऱ्या विधेयकावर चर्चेसाठी स्थापन होणार असलेल्या संयुक्त संसदीय समितीवर बहिष्कार टाकल्याचे जाहीर केले आहे.

काही महिन्यांपूर्वी आम आदमी पार्टीचे संस्थापक अरविंद केजरीवाल यांना भ्रष्टाचाराच्या आरोपात अटक झाली. त्यावेळी केजरीवाल गंभीर आरोपात तुरुंगात असूनही त्यांनी राजीनामा देणे टाळले होते. तुरुंगातून मुख्यमंत्री सरकार चालवत होते. कायद्याचे राज्य या संकल्पनेलाच दिल्लीतल्या घटनेमुळे धक्का लागला होता. यामुळेच नैतिकतेचा मुद्दा मांडत केंद्र सरकारने पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांनाही गंभीर गुन्ह्याप्रकरणी तुरुंगात गेल्यास आपोआप पदमुक्त करण्याची तरतूद असलेले विधेयक लोकसभेत सादर केले. गंभीर गुन्ह्याप्रकरणी किमान ३० दिवस तुरुंगात घालवले किंवा तशी कोठडी देण्यात आली तर संबंधित मंत्री आपोआप पदमुक्त होईल अशी तरतूद असलेले विधेयक केंद्र सरकारने सादर केले आहे.

या विधेयकाच्या मसुद्यावर सर्व बाजूंनी पुरेसा विचार व्हावा यासाठीच विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा ठराव केंद्राने लोकसभेत मंजूर करुन घेतला. . आता विधेयकावर साधकबाधक चर्चा करण्याची संधी असताना विरोधक संयुक्त संसदीय समितीवर बहिष्कार टाकत आहेत. यामुळे स्वतःच्या गुन्हेगारी प्रकरणात अडकलेल्या नेत्यांना वाचवण्यासाठी विरोधक रडीचा डाव खेळत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

## आता २९ ऑगस्टला फाईट, चलो मुंबई; जरांगेंचा इशारा

मुंबई : मराठा आरक्षणासाठी २९ ऑगस्ट रोजी मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या घराबाहेर येतोय, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. बीडच्या मांजारसुंबा येथे झालेल्या बैठकीअंती जरांगेंनी राज्य शासनाला इशारा दिला. याप्रसंगी कार्यकर्त्यांशी बोलताना जरांगेंनी अनेक महत्त्वाच्या सूचना दिल्या. आंदोलनात जाळपोळ किंवा दगडफेक करुन आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करा; असे जरांगेंनी कार्यकर्त्यांना सांगितले.

एकही मराठ्याची अस्सल अवलाद माघारी जाऊ शकत नाही. तुम्ही गर्व वाटावं असं काम करत आहेत. बीडचं हे नुसतं रुप बघून सरकारला रातभर झोप राहणार नाही. बेजार होणार. चलो मुंबई. २९ ऑगस्टला जमून फाईटच आहे. काय मराठ्यांची अवलाद आहे ते आम्ही तुम्हाला दाखवतो. आपल्याला शांततेत जायचं आहे आणि शांततेत आंदोलन करायचं आहे; असं मनोज जरांगे म्हणाले. आरक्षणासाठी ही शेवटची लढाई आहे. मुंबईला येण्याची हौस नाही. पण लेकराबाळांसाठी यावं लागतंय. २९ ऑगस्टला मुंबईला जायचं आहे. २७ ऑगस्टला सकाळी दहा वाजता आंतरवलीतून मुंबईला निघायचं. समाजाला डाग लागेल असं पाऊल उचलायचं नाही. कुणी दगडफेक आणि जाळपोळ करायची नाही, असंही मनोज जरांगे म्हणाले. बीडच्या मांजारसुंबा येथे जरांगेंच्या सभेसाठी आयोजकांनी डीजे वाजवण्यासाठी परवानगी मागितली होती. पण त्यांची मागणी डीवायएसपींनी मान्य केली नाही. यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या भाषणात डीआवयएसींना इशारा दिला. 'मला आणि माझ्या समाजाला डीजे वाजू दिला नाही म्हणून काय अडचण नाही. पण डीवायएसपी साहेबांना एकच सांगतो, सत्ता येत असते आणि जात असते.

## भारतीय जनता पक्षाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाचा शोध सुरुच

### पदासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात विचारमंथन सुरू

नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाचा शोध सुरुच आहे. विद्यमान अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ मागील लोकसभा निवडणुकीच्या आधीच संपला. निवडणूक तोंडावर असल्याने त्यांचा कार्यकाळ वाढवण्यात आला. आता निवडणूक सव्वा वर्ष उलटली तरीही भाजपला नवा राष्ट्रीय अध्यक्ष मिळालेला नाही. बिहार विधानसभा निवडणुकीच्या आधी पक्षाला नवा अध्यक्ष मिळू शकतो.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखा घोषित होण्याआधी भाजपला नवा अध्यक्ष मिळालेला असेल. राष्ट्रीय अध्यक्षाची निवड होण्यास विलंब होण्यामागे काही महत्त्वाची कारणे आहेत. यातील प्रमुख कारण म्हणजे भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सुरु असलेले विचारमंथन आहे. भाजप आणि संघाने १०० वरिष्ठ नेत्यांची मते विचारात घेतली आहेत. यात पक्षाचे माजी अध्यक्ष, वरिष्ठ केंद्रीय मंत्री आणि संघ, भाजपशी संबंधित वरिष्ठ नेत्यांचा समावेश आहे.

अचानक लागलेली उपराष्ट्रपती पदाची निवडणूक भाजप अध्यक्षांची निवड रखडण्यामागचे दुसरे कारण म्हणजे जगदीप धनखड अचानक राजीनामा देतील याची कल्पना भाजपला केली होती. धनखड यांनी पायउतार केल्याने उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक लागली. त्यामुळे आता ही निवडणूक भाजपसाठी प्राधान्याचा विषय आहे. एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन अधिकाधिक मतांनी जिंकावेत यासाठी सध्या भाजपकडून प्रयत्न केले जात आहेत.

तसेच गुजरात, उत्तर प्रदेश, कर्नाटकसह अनेक राज्यांमध्ये प्रदेशाध्यक्ष निवडण्यास होत असलेला विलंब आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचे गृहराज्य असलेल्या गुजरातमध्ये भाजपला अद्याप नवा प्रदेशाध्यक्ष मिळालेला नाही. योगी आदित्यनाथ यांच्या उत्तर प्रदेशातही हीच स्थिती आहे. या दोन्ही राज्यांमध्ये भाजपची सत्ता आहे. गुजरात भाजपचे अध्यक्षपद सध्याच्या घडीला सी. आर. पाटील यांच्याकडे आहे. गेल्या ५ वर्षांपासून त्यांच्या गुजरात भाजपची धुरा आहे. ते नवसारीतून चारवेळा लोकसभेवर निवडून गेले आहेत.

सध्या त्यांच्याकडे जलशक्ती मंत्रिपदाचा कार्यभार आहे. मोदी, शहांच्या गुजरातमध्ये भाजपचे नेतृत्त्व कोणाकडे जाणार याबद्दल राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. दुसरीकडे उत्तर प्रदेशात वेगळाच पेच निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या जवळच्या नेत्याकडे प्रदेशाध्यक्षपद देण्याची भाजपच्या नेतृत्त्वाची तयारी नाही. तशी नियुक्ती झाल्यास राज्य सरकारसह संघटनेवर योगी यांचे वर्चस्व निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे आदित्यनाथ यांच्या कंपूबाहेरील व्यक्तीकडे धुरा दिली जाण्याची दाट शक्यता आहे.

आधी राज्यांमध्ये प्रदेशाध्यक्षांची नेमणूक करुन मग पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडायचा, असा भाजपचा प्रयत्न आहे. राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याआधी ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील किमान १९ ठिकाणी प्रदेशाध्यक्षांची नेमणूक होणे गरजेचे आहे. भाजपच्या घटनेत तसा उल्लेख आहे.

## अपघातामध्ये प्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू फरीद हुसेनचा मृत्यू

जम्मू आणि काश्मीर: रस्ते अपघातामध्ये भारतीय क्रिकेटपटूचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या अपघाताचं धक्कादायक सीसीटीव्ही फुटेजही समोर आलं आहे. फरीद हुसैन असे मयत पावलेल्या स्थानिक क्रिकेटपट्टूचे नाव आहे.

जम्मू-काश्मीरमधील पुंछ जिल्ह्यातील स्थानिक क्रिकेटर फरीद हुसेन याचा २० ऑगस्ट रोजी झालेल्या रस्ते अपघातात मृत्यू झाला. सीसीटीव्हीमध्ये कैद झालेल्या या घटनेत फरीद दुचाकीवरून जात असताना एका कारचं दार अचानक उघडलं आणि ते थेट कारच्या दाराला धडकले. अपघात इतका भीषण होता की जमिनीवर कोसळताच ते गंभीर जखमी झाले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

कोण होता फरीद हुसैन?

क्रिकेटची आवड असलेल्या फरीद हुसैनला त्याच्या प्रतिभेमुळे उदयोन्मुख खेळाडू म्हणून पाहिलं जात होतं. जम्मू-काश्मीरच्या स्थानिक क्रिकेट सामन्यांमध्ये फरीद हुसैन खेळायचा. जम्मू-काश्मीरच्या क्रिकेट वर्तुळातही त्याने नाव कमावलं होतं. फरीदच्या अकाली निधनामुळे त्याचे सहकारी, खेळाडू आणि चाहत्यांमध्ये शोक पसरला आहे. मेहनती आणि प्रतिभावान खेळाडू असलेल्या फरीद हुसैन याची कारकीर्द नुकतीच आकार घेऊ लागली होती, पण तेव्हाच घात झाला असल्याच्या प्रतिक्रिया फरीदच्या सहकाऱ्यांनी दिल्या आहेत.

72198 21111

BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. *एक्स-शोरुम किंमत पल्सर बेस वेरिएंट्ससाठी. **पल्सर 125 निऑनसाठी डाउन-पेमेंट हे मार्जिन मनी आहे. मार्जिन मनीमधून डीसीसी शुल्क, प्रक्रिया शुल्क, इतर शुल्क वगळले आहेत. फायनान्स पूर्णपणे फायनान्शिअरच्या विवेकानुसार. नियम आणि अटी लागू. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सने, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी रहदारीचे आणि सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्सवर आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून पुरवली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031.

विदेश

# बलुचिस्तानची गळचेपी

बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानची दडपशाही सुरूच आहेत. ते केवळ बलुचिस्तानचा आवाज दाबत नाही तर त्याचा गळा दाबत आहे. आता तिथे ३१ ऑगस्टपर्यंत इंटरनेट बंद ठेवण्यात आले आहे. इंटरनेट बंदमुळे शिक्षण, ऑनलाइन व्यवसाय आणि मीडिया रिपोर्टिंगमध्ये मोठा व्यत्यय येत आहे. सुरक्षेच्या कारणास्तव हे पाऊल उचलण्यात आल्याचे पाकिस्तानी सरकारचे म्हणणे आहे. बलुचिस्तान पोस्टने अधिकाऱ्यांना उद्धृत करत म्हटले आहे की पाकिस्तान टेलिकम्युनिकेशन अथॉरिटी (पीटीए) च्या अधिसूचनेने पुष्टी केली आहे की ३१ ऑगस्टपर्यंत संपूर्ण बलुचिस्तानमध्ये मोबाइल इंटरनेट सेवा बंद राहतील. सरकारी प्रवक्ते शाहिद रिंद म्हणाले की सशस्त्र गट त्यांच्या क्रियाकलापांचे समन्वय साधण्यासाठी इंटरनेटचा वापर करत आहेत. इंटरनेटवर बंदी घालण्याचा उद्देश अशा संप्रेषण माध्यमांमध्ये व्यत्यय आणणे आहे. संघीय सरकारच्या या निर्णयावर विद्यार्थी, व्यापारी, पत्रकार आणि मानवाधिकार संघटनांनी जोरदार टीका केली आहे. ऑनलाइन वर्ग घेणारे विद्यार्थी नाराज आहेत आणि असाइनमेंट सादर करू शकत नाहीत. ग्रामीण भागात परिस्थिती आणखी गंभीर आहे. क्वेटा, तुर्बत, पंजगुर आणि खुजदार येथील स्वतंत्र पत्रकार आणि उद्योजक म्हणतात की त्यांचे जीवनमान ठप्प झाले आहे. आमचे संपूर्ण काम इंटरनेटवर अवलंबून आहे. या बंदमुळे आम्हाला आर्थिक संकटाचा सामना करावा लागला आहे, असे एका व्यावसायिकाने सांगितले. मीडिया संस्थांवरही परिणाम झाला आहे. पत्रकारांचा दावा आहे की ते या प्रदेशातून बातम्या प्रसारित करू शकत नाहीत. काही जण याला ''माहिती बंद'' म्हणत आहेत. मानवाधिकार गटांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे आणि इंटरनेट बंद करणे हे नागरी स्वातंत्र्यांचे उल्लंघन आणि नागरिकांच्या शिक्षण, आर्थिक क्रियाकलाप आणि माहिती मिळवण्याच्या मूलभूत अधिकारांवर हल्ला असल्याचे म्हटले आहे. स्थानिक राजकीय आणि सामाजिक संघटनांचा असा युक्तिवाद आहे की सुरक्षा वाढवण्याऐवजी सरकार जनतेवर सामूहिक शिक्षा लादत आहे.

### बोलल्याबद्दल होणारा छळ

द बलुचिस्तान पोस्ट (टीबीपी) पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील परिस्थितीवर मत मांडते, ''बलुचिस्तान हा जगासाठी माहितीचा काळा डाग बनला आहे. ही परिस्थिती टिकवून ठेवण्यासाठी पाकिस्तानातील शक्तिशाली घटक सतत विविध युक्त्या अवलंबत आहेत. देशातील प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये बलुचिस्तानच्या वस्तुनिष्ठ वास्तवाबद्दल बोलणे हा एक अघोषित गुन्हा बनला आहे.'' टीबीपीने आपल्या संपादकीयात इतर मुद्दे उपस्थित केले आहेत. बलुचिस्तानच्या मुद्यावर लिहिणाऱ्या पत्रकारांना सरकारी दडपशाहीचा सामना करावा लागतो. राष्ट्रीय चिंता व्यक्त करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले जाते आणि जगाला बलुचिस्तानमध्ये प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी मोबाईल इंटरनेटवर बंदी घालणे सामान्य झाले आहे. बलुचिस्तानच्या बहुतेक भागात इंटरनेट सेवा आधीच बंद करण्यात आली होती आणि मोबाईल इंटरनेट फक्त काही प्रमुख शहरांमध्ये उपलब्ध होते.

> पाकिस्तानची बलुचिस्तानमध्ये दडपशाही सुरूच आहे. तेथील आवाज दाबण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत इंटरनेट बंद ठेवण्यात आले आहे. तेथे सत्य बोलणे, लिहिणे सगळेच प्रतिबंधित आहे. ही गळचेपी बलुचिस्तानच्या बंडाला कारणीभूत तर ठरणार नाही ना, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

बिघडत्या सुरक्षा परिस्थितीचे कारण देत, ६ ऑगस्टच्या संध्याकाळपासून संपूर्ण बलुचिस्तानमध्ये मोबाईल इंटरनेटवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. पाकिस्तानच्या मानवाधिकार आयोगाच्या ९-१२ जुलै २०२५ च्या तथ्य-शोधक अहवालाचा हवाला देत, टीबीपीने म्हटले आहे की बलुचिस्तानमध्ये लोकांना जबरदस्तीने उचलून नेण्याची एक अतिशय चिंताजनक प्रवृत्ती सुरू आहे. लोकशाही स्वातंत्र्यावर अंकुश लावला जात आहे. प्रांतीय स्वायत्तता आणखी कमी केली जात आहे. पत्रकारितेवर कडक निर्बंध आहेत. दडपशाहीची संस्कृती अखंडपणे सुरू आहे. हे सर्व घटक बलुचिस्तानमध्ये लोकांचे वेगळेपण आणि राजकीय अस्थिरता वाढवत आहेत. असे म्हटले आहे की माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात, इंटरनेट सेवा बंद केल्याने विद्यार्थी, व्यापारी, ई-कॉमर्स, मोबाइल बँकिंग आणि फ्रीलांसिंगशी संबंधित लोकांवर सर्वाधिक परिणाम होतो. तथापि, याचा प्रतिकार चळवळींवर तात्काळ परिणाम होत नाही, कारण इंटरनेट निर्बंध केवळ माहितीचा प्रवाह तात्पुरता थांबवू शकतात. माहितीवर प्रवेश मर्यादित केल्याने सत्य समोर येण्यास विलंब होऊ शकतो, परंतु ते जगाला बलुचिस्तानमधील जमिनीवरील वास्तवापासून कायमचे अनभिज्ञ ठेवू शकत नाही.

(पाञ्चजन्यवरून साभार)

इतिहास

# काशी विश्वेश्वराचे सान्निध्य असलेले एकमेव मंदिर

नाशिक जिल्हा हा धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. शहरात अनेक भागात मंदिरेच मंदिरे पाहायला मिळतात. त्यात गणेश मंदिराचा वेगळाच इतिहास वाचायला मिळतो. नाशिकच्या गोदा तीरावरील मोदकेश्वर गणेशाचे मंदिर पाहायला मिळते. आजही हे मंदिर सुस्थितीत असून या मंदिराची स्थापनेचा निश्चित कालावधी नसला तरी साधारण चारशे ते पाचशे वर्षांचा इतिहास लाभलेला आहे.

नाशिक शहरातील प्रसिद्ध असलेल्या गोदावरीच्या तीरावर गाडगेबाबा महाराज धर्मशाळेजवळ हे मंदिर असून मोदकेश्वर गणपती देवस्थान अतिशय पुरातन असून त्याचे इतिहास व स्थान प्राचीन असल्याचे सांगण्यात येते. नाशिकचे ग्रामदैवत म्हणून मोदकेश्वर गणपतीला म्हणून ओळखला जातो. गणेशकोश, पंचवटी-यात्रा दर्शन, गोदावरी माहात्म्य यात मोदकेश्वराचा उल्लेख आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध २१ गणपती क्षेत्रांत मोदकेश्वराची गणना होते. गोदावरीच्या पश्चिम तीरावर, नाव दरवाजाजवळ हे स्वयंभू गणेशाचे मंदिर आहे.

नाशिककरांचे ग्रामदैवत असल्याने अनेक भाविक शुभकार्याप्रसंगी, कार्यारंभी दर्शनासाठी येतात. दर महिन्याची संकष्टी चतुर्थी, भाद्रपद आणि माघातील उत्सवाच्या वेळी विविध अलंकारांनी मोदकेश्वराला सजविले जाते. गणेशोत्सवात मंदिराला आकर्षक रोषणाई केली जाते. त्या काळात विशेष महापूजेचे आयोजन केले जाते. भाविकांना प्रसाद म्हणून मोदक दिला जातो.

> गणेशकोश, पंचवटी-यात्रा दर्शन, गोदावरी माहात्म्य यात मोदकेश्वराचा उल्लेख आहे. महाराष्ट्रातील प्रसिद्ध २१ गणपती क्षेत्रांत मोदकेश्वराची गणना होते. गोदावरीच्या पश्चिम तीरावर, नाव दरवाजाजवळ हे स्वयंभू गणेशाचे मंदिर आहे. नाशिककरांचे ग्रामदैवत असल्याने अनेक भाविक शुभकार्याप्रसंगी, कार्यारंभी दर्शनासाठी येतात. दर महिन्याची संकष्टी चतुर्थी, भाद्रपद आणि माघातील उत्सवाच्या वेळी विविध अलंकारांनी मोदकेश्वराला सजविले जाते. गणेशोत्सवात मंदिराला आकर्षक रोषणाई केली जाते. त्या काळात विशेष महापूजेचे आयोजन केले जाते.

### अशी आहे मोदकेश्वर गणेश मूर्ती

मोदकेश्वर मंदिरातील मूर्ती स्वयंभू असून मूर्तीचा मोदकासारखा आकार असल्याने मंदिराला मोदकेश्वर गणेश मंदिर हे नाव पडले. मंदिराला तीनशे ते चारशे वर्षांचा इतिहास असल्याने मंदिरातील काही भाग पुरातन इतिहासाची साक्ष देतो. तर चार खांब असलेल्या गाभाऱ्यात शेंदूर विलेपित मोदकेश्वर विराजमान आहे. मागील बाजूस रिद्धी-सिद्धी यांच्या मूर्ती आहेत. मोदकेश्वराच्या बाजूलाच विश्वेश्वर महादेव आहे. पिता-पुत्रांचे इतके जवळचे सान्निध्य असणे हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. याबरोबरच बाजूलाच इतर देवतांच्या छोटया छोटया मूर्ती आहेत. प्रात:काळी सूर्यकिरण मोदकेश्वरावर येत असल्याने हे चित्र विलोभनीय असते.

### अशी आहे आख्यायिका

मोदकेश्वर या नावामागे रोचक आख्यायिका सांगितली जाते. एकदा गणेश आणि स्कंद यांच्यात मोदकावरून जोरदार भांडण झाले. यावेळी महादेवाने त्यांच्यातील वादावर तोडगा काढत त्यांची परीक्षा घेतली. या परीक्षेत गणेश उत्तीर्ण झाले. यानंतर गणेशाला तो मोदक प्राप्त झाला. हाच मोदक हातात घेऊन गणेश भ्रमण करत असताना नाशिकच्या गोदावरी नदीच्या काठाने जात असताना त्याच्या हातातील मोदक खाली पडला. मोदकासाठी परीक्षा द्यावी लागली होती, शिवाय आवडता पदार्थ असल्याने तो खाली पडल्यामुळे गणेश खाली उतरला, याची आठवण रहावी म्हणून गणेशाने स्वयंभू गणेशमूर्तीच्या स्वरुपात तेथे वास्तव्य केले. पुढे हेच ठिकाण मोदकेश्वर मंदिर म्हणून प्रचलित झाले.

आरोग्य

# तीन इलेक्ट्रॉनिक वस्तू... हृदयासाठी हानिकारक

आजच्या युगात, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनली आहेत. मोबाईल असो, वाय-फाय राउटर असो किंवा इतर स्मार्ट उपकरणे असोत, हे सर्व आपले दैनंदिन काम सोपे करतात. पण तुम्हाला माहिती आहे का की काही इलेक्ट्रिक उपकरणे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात? विशेषत:, हृदयरोग आणि हृदयविकाराचा धोका वाढवण्यात हे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. जर तुम्ही हृदयाच्या आरोग्याबद्दल जागरूक असाल, तर तुम्ही तुमच्या घरात ठेवलेल्या या तीन इलेक्ट्रॉनिक वस्तूंकडे त्वरित लक्ष दिले पाहिजे आणि त्या लवकरात लवकर काढून टाकल्या पाहिजेत किंवा त्यांचा वापर मर्यादित ठेवला पाहिजे.

### वाय-फाय राउटर आणि मोबाईल रेडिएशन

आजच्या डिजिटल युगात, प्रत्येक घरात वाय-फाय राउटर आणि मोबाईल फोन आहेत. पण फार कमी लोकांना माहिती आहे की त्यांच्यापासून निघणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशनचा आपल्या शरीरावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. ईएमएफ किरणोत्सर्गाच्या सतत संपर्कात राहिल्याने हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात. उच्च किरणोत्सर्गामुळे रक्तदाब आणि ताण वाढू शकतो, ज्यामुळे हृदयावर दबाव येतो. जास्त काळ वाय-फाय आणि मोबाईल रेडिएशनच्या संपर्कात राहिल्याने हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.

**काय करावे:** रात्री वाय-फाय राउटर बंद करा आणि तो बेडरूमपासून दूर ठेवा. झोपताना मोबाईल फोन उशाजवळ ठेवू नका आणि हेडफोनऐवजी स्पीकर वापरा. तसेच ईएमएफ ब्लॉकर डिव्हाइस वापरा.

### इंडक्शन कुकटॉप आणि मायक्रोवेव्ह ओव्हन

आजकाल, इंडक्शन स्टोव्ह आणि मायक्रोवेव्हचा वापर वाढला आहे, परंतु हे हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात हे फार कमी लोकांना माहिती आहे. इंडक्शन कुकटॉप्स आणि मायक्रोवेव्हमधून उत्सर्जित होणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्हज शरीराच्या पेशींवर नकारात्मक परिणाम करू शकतात. यामुळे रक्ताभिसरणावर परिणाम होऊ शकतो आणि हृदयावर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. त्यांच्या दीर्घकाळ वापरामुळे हृदयाचे ठोके अनियमित होऊ शकतात आणि रक्तदाब वाढू शकतो.

**काय करावे:** इंडक्शन कुकटॉपऐवजी पारंपारिक गॅस स्टोव्ह वापरा. मायक्रोवेव्हचा वापर कमीत कमी करा, विशेषत: जास्त वेळ उभे राहू नका आणि वाट पाहू नका. अन्न गरम करण्यासाठी स्टील किंवा मातीची भांडी जास्त वापरा.

### स्मार्टवॉच आणि फिटनेस ट्रॅकर्स

जरी स्मार्टवॉच आणि फिटनेस ट्रॅकर्स आरोग्यावर लक्ष ठेवण्यासाठी उपयुक्त वाटत असले तरी, त्यांच्याकडून उत्सर्जित होणारे ब्लूटूथ आणि आरएफ रेडिएशन तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात. स्मार्ट घड्याळे सतत ब्लूटूथ सिग्नल पाठवतात आणि प्राप्त करतात, ज्यामुळे शरीर सतत रेडिएशनच्या संपर्कात राहते. अनेक अभ्यासातून असे दिसून येते की हृदयाच्या ठोक्यांच्या लयीत अडथळा येऊ शकतो. जर एखाद्याला आधीच हृदयरोग असेल, तर सतत स्मार्ट घड्याळ वापरल्याने ही समस्या आणखी वाढू शकते.

**काय करावे:** स्मार्टवॉच मर्यादित प्रमाणात वापरा आणि रात्री ते काढा. ब्लूटूथशी जोडलेली उपकरणे जास्त काळ घालू नका. गरज असेल तेव्हाच तुमचे स्मार्टवॉच वापरा आणि नियमित ब्रेक घ्या.

घरवापसी

# जन्माष्टमीला 'कृष्ण' परतला

महादेवगड मंदिरात आयोजित एका भव्य घरवापसी समारंभात खंडवा जिल्ह्यातील एका मुस्लिम तरुणाने सनातन धर्मात परत प्रवेश केला. मूळचे अनीश नाव असलेल्या या तरुणाने घरवापसीद्वारे आपली मुळे स्वीकारली आणि कृष्ण हे नाव निवडले. हे नाव भगवान कृष्णावरील त्याच्या आयुष्यभराच्या भक्तीचे प्रतिबिंब असल्याचे त्याने म्हटले आहे.

मंदिरात संपूर्ण वैदिक परंपरेने हा विधी पार पडला. आता कृष्ण असलेल्या अनिशचे वैदिक मंत्रोच्चार, पूजा आणि पुष्पवृष्टीसह औपचारिक स्वागत करण्यात आले. देशभरातील हिंदूंनी भगवान श्रीकृष्णाचा जन्मोत्सव साजरा केला त्याच दिवशी शेकडो भाविकांनी त्याची घरवापसी पाहिल्यामुळे मंडीतील वातावरण भक्तीने भरले होते.

आपल्या निर्णयाबद्दल बोलताना कृष्णाने (पूर्वीचे अनीश) सांगितले की सनातन धर्माकडे त्यांचा प्रवास बालपणापासून सुरू झाला होता. तो भागवत कथा ऐकत होता आणि विशेषत: भगवान श्रीकृष्णांच्या खेळकर पण गहन लीलांकडे आकर्षित झाला होता. ''कृष्णाच्या लीलांमधल्या करुणा, मैत्री आणि जीवनाच्या धड्यांनी मला खोलवर स्पर्श केला. गीतेतील त्यांच्या शिकवणींनी माझ्या जीवनाची दिशा बदलली. मला अस्तित्वाचा खरा उद्देश आणि आत्म्याचे शाश्वत मूल्य कळले.

भगवान कृष्ण हे केवळ देवता नसून ''खरा मार्गदर्शक, मित्र आणि जीवन शिक्षक'' असल्याचे सांगून, कृष्णाने स्पष्ट केले की जन्माष्टमी हा हा निर्णायक पाऊल उचलण्यासाठी सर्वात शुभ क्षण होता.

> भगवान कृष्ण हे केवळ देवता नसून ''खरा मार्गदर्शक, मित्र आणि जीवन शिक्षक'' असल्याचे सांगून, कृष्णाने स्पष्ट केले की जन्माष्टमी हा हा निर्णायक पाऊल उचलण्यासाठी सर्वात शुभ क्षण होता.

मंदिराचे प्रभारी अशोक पालीवाल पुढे म्हणाले की, अनीश यांनी १६ व्या शतकातील मुस्लिम कवी रस्खान यांच्याकडूनही प्रेरणा घेतली, जे त्यांच्या भावपूर्ण कृष्णभक्तीसाठी ओळखले जातात. ''रस्खानच्या कविता कृष्णाचे दिव्य बालपण, वृंदावनाचे सौंदर्य आणि गोपींच्या भक्तीचे सुंदर चित्रण करतात. या श्लोकांनी अनीशवर खोलवर छाप सोडली आणि त्याच्यात भक्तीचे बीज रोवले.

त्यांनी पुढे जोर देऊन सांगितले की, सनातन धर्म सर्वसमावेशक आणि सार्वत्रिक आहे. जेव्हा भक्ती खरी असते तेव्हा धर्म, जात किंवा समुदायाचा कोणताही अडथळा नसतो. अनीशची घरवापसी ऐच्छिक होती, कोणत्याही जबरदस्ती किंवा सक्तीशिवाय. तो फक्त धर्माच्या शाश्वत मार्गावर घरी परतला आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

### झेनो हेल्थच्या ५ व्या मेडिकल स्टोरचे उद्घाटन

नाशिक : मुंबई आणि पुण्यातील विश्वसनीय फार्मसी चेन, झेनो हेल्थने आज नाशिकमध्ये त्यांच्या ५ व्या मेडिकल स्टोरच्या उद्घाटनाची घोषणा केली, ज्याचे उद्घाटन महाराष्ट्राचे अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री, ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राचे ३ वेळचे माजी उपमुख्यमंत्री माननीय श्री छगन भुजबळ यांच्या हस्ते झाले. झेनो हेल्थने केवळ काही आठवड्यांत चार नवीन मेडिकल स्टोर्स उघडले आहेत. आता त्यांच्या ५ व्या स्टोरचे उद्घाटन नाशिककरांना परवडणारी आणि उच्च दर्जाची ब्रँडेड व जेनेरिक औषधे उपलब्ध करून देण्याच्या झेनो हेल्थच्या ध्येयातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. या नवीन लाँचसह, महाराष्ट्रात झेनो हेल्थची उपस्थिती २०४ स्टोर्सपर्यंत वाढली आहे.

### विवोने पहिले मिक्स्ड रिॲलिटी हेडसेट आणि नवीन इमेजिंग स्ट्रॅटेजी सादर केली

पुणे – विवो ने आज डोंगगुआन येथे झालेल्या विवो व्हिजन लाँच इव्हेंट आणि इमेजिंग ग्रँड सेरेमनीत आपला ३० वा वर्धापन दिन साजरा केला. या कार्यक्रमात कंपनीने आपला पहिला मिक्स्ड रिॲलिटी (एमआर) हेडसेट – विवो व्हिजन डिस्कव्हरी एडिशन सादर केला. हा लाँच विवोच्या स्थानिक संगणन आणि इमर्सिव्ह तंत्रज्ञानातील प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.इमेजिंग, सेन्सर आणि डिस्प्ले तंत्रज्ञानातील आपल्या सखोल कौशल्याचा वापर करून, विवोने एमआर उपकरणांशी संबंधित प्रमुख अभियांत्रिकी आव्हाने – विशेषतः धारणा, परस्परसंवाद आणि संगणकीय कामगिरी – पद्धतशीरपणे सोडवली आहेत.

### महाराष्ट्रातील पीएम श्री शाळांबरोबर शिक्षक क्षमता विकास कार्यक्रम सुरू

जालना : कोटक महिंद्रा समूहाची सीएसआर अंमलबजावणी संस्था, कोटक एज्युकेशन फाउंडेशन ने महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांमधील ३००हून अधिक पीएम श्री शाळांमध्ये शिक्षक क्षमता वाढ कार्यक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाचा उद्देश क्षिकांना अशी कौशल्ये व मार्गदर्शन देणे आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी मजबूत आणि परिणामकारक शिक्षणाचे वातावरण निर्माण होईल. या उपक्रमाचे ध्येय निपुण भारतअंतर्गत निश्चित शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षकांना साथ देणे आहे. या माध्यमातून शिक्षकांना अध्यापन अधिक गुणवत्तापूर्ण आणि परिणामकारक बनविण्यासाठी नवे मार्ग व साधने उपलब्ध होतील.

### इलेक्ट्रिक मोबिलिटी भविष्याला गती देण्यासाठी संयुक्त उपक्रम

छत्रपती संभाजीनगर : केएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, ही नवी पिढीची इलेक्ट्रिक मोबिलिटी कंपनी, हिचे अधिकृत उद्घाटन आज अरलुमुडू येथील केरळ ऑटोमोबाइल्स लिमिटेड च्या कारखान्यात झाले. ही कंपनी केरळ सरकारच्या मालकीच्या, चार दशकांहून अधिक अनुभव असलेल्या केरळ ऑटोमोबाइल्स लिमिटेड आणि भारतातील सर्वात सक्रिय व नाविन्यपूर्ण ईवी ब्रँडपैकी एक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड यांच्यातील संयुक्त उपक्रम आहे. उद्घाटन सोहळ्यास केरळ सरकारचे माननीय उद्योग, कायदा व नारळ खात्याचे मंत्री श्री. पी. राजीव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नेय्याट्टिनकारा येथील आमदार श्री. के. अंसलन यांनी भूषविले. या प्रसंगी श्री. रमेश मिगलानी (संचालक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह), श्री. वीर सिंह (सीईओ, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह व एमडी, केएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज), डॉ. सुनील कोरगांवकर (संचालक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह), श्रीमती एनी जुला थॉमसआयएएस (ओएसडी), उद्योग विभाग), श्री. पुल्लुविला स्टॅनली (अध्यक्ष, केरळ ऑटोमोबाइल्स), श्री. राजमोहन (अध्यक्ष, नेय्याट्टिनकारा नगरपालिका), श्रीमती एल. राणी (अध्यक्ष, अथियान्नूर ब्लॉक पंचायत), श्री. के. अजितकुमार (कार्यकारी अध्यक्ष, पीटी) आणि श्रीमती अजीथाके.एस. (नगरसेवक, अथियान्नूर) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### यूट्यूबसोबत एका महत्वपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचे डिजिटल-फर्स्ट पर्व

इंडियन एक्सप्रेस ग्रुप अभिमानाने यूट्यूबवर स्क्रीन वॉर्ड्स २०२५ चा नवा अविष्कार सादर करत आहे. स्क्रीन वॉर्ड्स हा भारतीय सिनेमाच्या आणि कथाकथनाच्या सर्वात प्रतिष्ठित उत्सवांपैकी एक आहे.हा फक्त आणखी एक वॉर्ड शो नाही. स्क्रीन वॉर्ड्स २०२५ हा संपादकीय विश्वासार्हता, सांस्कृतिक वारसा आणि डिजिटल पोहोच यांचा शक्तिशाली संगम आहे. इंडियन एक्सप्रेस ग्रुप च्या पत्रकारिता प्रथम (जर्नलिझम-फर्स्ट) तत्त्वज्ञानावर आधारित हे पुरस्कार प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेचे द्योतक आहेत. एक स्वतंत्र, ना-नफा तत्वावरील संस्था स्क्रीन अकादमी द्वारे विजेत्यांची निवड केली जाते. या अकादमीमध्ये ख्यातनाम चित्रपट निर्माते, कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गज सहभागी आहेत. त्यांचा उद्देश खऱ्या उत्कृष्टतेला ओळख देणे आहे.

### केएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, नवी पिढीची इलेक्ट्रिक मोबिलिटी कंपनी

नाशिक : केएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड, ही नवी पिढीची इलेक्ट्रिक मोबिलिटी कंपनी, हिचे अधिकृत उद्घाटन आज अरलुमुडू येथील केरळ ऑटोमोबाइल्स लिमिटेड च्या कारखान्यात झाले. ही कंपनी केरळ सरकारच्या मालकीच्या, चार दशकांहून अधिक अनुभव असलेल्या केरळ ऑटोमोबाइल्स लिमिटेड आणि भारतातील सर्वात सक्रिय व नाविन्यपूर्ण ईवी ब्रँडपैकी एक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह प्रायव्हेट लिमिटेड यांच्यातील संयुक्त उपक्रम आहे. उद्घाटन सोहळ्यास केरळ सरकारचे माननीय उद्योग, कायदा व नारळ खात्याचे मंत्री श्री. पी. राजीव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नेय्याट्टिनकारा येथील आमदार श्री. के. अंसलन यांनी भूषविले. या प्रसंगी श्री. रमेश मिगलानी (संचालक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह), श्री. वीर सिंह (सीईओ, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह व एमडी, केएएल लॉर्ड्स टेक्नॉलॉजीज), डॉ. सुनील कोरगांवकर (संचालक, लॉर्ड्स ऑटोमेटिव्ह), श्रीमती एनी जुला थॉमसआयएएस (ओएसडी), उद्योग विभाग), श्री. पुल्लुविला स्टॅनली (अध्यक्ष, केरळ ऑटोमोबाइल्स), श्री. राजमोहन (अध्यक्ष, नेय्याट्टिनकारा नगरपालिका), श्रीमती एल. राणी (अध्यक्ष, अथियान्नूर ब्लॉक पंचायत), श्री. के. अजितकुमार (कार्यकारी अध्यक्ष, पीटी) आणि श्रीमती अजीथाके.एस. (नगरसेवक, अथियान्नूर) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### जालना येथे पोलीस दलासाठी 'एम्पॉवरिंग अवर प्रोटेक्टर्स' उपक्रमाचे आयोजन

जालना : सीडीएसएल इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंडातर्फे (सीडीएसएल आयपीएफ) 'एम्पॉवरिंग अवर प्रोटेक्टर्स' या प्रमुख उपक्रमांतर्गत जालना येथील मुख्य पोलीस प्रशिक्षण केंद्रात गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम यशस्वीपणे घेण्यात आला. पोलीस कर्मचारी, माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आर्थिक साक्षरता वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.या प्रसंगी तज्ज्ञांनी महत्त्वाच्या आर्थिक संकल्पना प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून सोप्या भाषेत स्पष्ट केल्या. त्यामुळे उपस्थितांना विषय अधिक नेटकेपणाने समजला. विविध क्षेत्रांतील व्यक्तींना सुजाण गुंतवणूक निर्णय घेण्यासाठी आवश्यक ज्ञान व साधने उपलब्ध करून देणे, आर्थिक स्वावलंबनाची जाणीव त्यांच्यात निर्माण करणे आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत योगदान देणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट होते.

### कलाकारांनी त्यांच्या पाळीव प्राण्यांबाबत सांगितले!

कुत्रे पाळीव प्राण्यांपेक्षा अधिक आहेत, ते तणाव दूर करणारे आणि अतूट प्रेमाचे सोबती आहेत. यंदा इंटरनॅशनल डॉग डे निमित्त एण्ड टीव्हीवरील आपले लाडके कलाकार त्यांच्या पाळीव प्राण्यांसोबतचे खास नाते आणि ते आसपास असताना जीवन कशाप्रकारे आनंददायी होते याबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत पारस अरोरा (जीतू, 'घरवाली पेडवाली'), गीतांजली मिश्रा (राजेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि सोमा राठोड (अम्मा, 'भाबीजी घर पर है'). आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मधील पारस अरोरा ऊर्फ जीतू म्हणाले, माझ्या जिवलग मित्राकडे दोन कुत्रे आहेत.

# जिल्ह्यात डीजेमुक्त गणेशउत्सव साजरा करावा - पालकमंत्री संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर, दि. २४ – गणेशोत्सव हा यावर्षी राज्य महोत्सव म्हणून साजरा करत आहोत. या महोत्सवाची तयारी पोलीस प्रशासन व जिल्हा प्रशासनाने उत्तम पद्धतीने केली आहे, यामध्ये गणेश मंडळांनी देखील पुढाकार घेऊन शांततेत आणि उत्साहाच्या वातावरणात डीजे ऐवजी पारंपारिक वाद्याचा वापर करत डीजे मुक्त गणेश उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी आज गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समन्वय समितीच्या बैठकीत केले.एमआयटी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जालना मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे, राज्यसभेचे खासदार डॉ.भागवत कराड आमदार प्रदीप जयस्वाल महानगरपालिका आयुक्त जी .श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी ,पोलीस आयुक्त प्रवीण पवार, गणेश मंडळाचे अध्यक्ष पृथ्वीराज पवार, यांच्यासह विविध गणेश मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

शिरसाट म्हणाले की, प्रशासनाने विविध समस्या सोडवून गणेशोत्सवाची तयारी केली आहे ही आनंदाची बाब असून गणेश उत्सव पाहण्यासाठी येणाऱ्या कुटुंबातील सर्व नागरिकांना गणेशोत्सवाचा आनंद घेता यावा यासाठी गणेश मंडळाने डीजे मुक्त उत्सव साजरा करावा . डीजे ऐवजी पारंपारिक वाद्य, ढोलताशे व इतर वाद्याचा वापर करून उत्साहाचे वातावरण ठेवावे. त्याचबरोबर पोलीस प्रशासनाने अमलीपदार्थची विक्रीस प्रतिबंध तसेच यावरील कारवाई करण्याचे निर्देश यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाट यांनी पोलीस प्रशासनाला दिले.

छत्रपती संभाजीनगर हे विकासाच्या वाटेवर वेगाने वाटचाल करत असून यासाठी सर्व पक्ष, सर्व पदाधिकारी, नागरिक यांनी उत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्याची शांतता व प्रगतीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी उपस्थित गणेश मंडळ पदाधिकारी व नागरिकांना त्यांना केले.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महापालिकेने गणेश विसर्जनाची तयारी कृत्रिम तलावाच्या माध्यमातून वेगवेगळ्या ठिकाणी करावी .यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याबाबतही पोलीस प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. खासदार कल्याण काळे यांनी लेझर लाईटचा वापर गणेशोत्सवा दरम्यान करू नये, त्याचप्रमाणे अमली पदार्थांचे विक्री प्रतिबंध तसेच यामध्ये स्थानिक पोलीस प्रशासनाने वेळीच कारवाई करण्याचेही आवाहन यावेळी केले. खासदार डॉ. भागवत कराड यांनी गणेश मंडळांनी अवयदान त्याचप्रमाणे आरोग्य शिबिर यासारख्या विविध समाज उपयोगी उपक्रमाची अंमलबजावणी करून वेगळ्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याबाबतही आवाहन केले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, गणेश उत्सव हा एकतेचा उत्सव असून या उत्सवाच्या माध्यमातून पर्यावरणाचे रक्षण करणारे संदेशाचे देखावे व इतर नाविन्यपूर्ण देखावे गणेश मंडळांनी करावे. व राज्य शासनाच्या होणाऱ्या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन नामांकन पाठवावे. वृक्षारोपण सारख्या मोहिमेत सहभाग घेऊन प्रत्येक गणेश मंडळांनी पुढाकार घेण्याचे ही यावेळी जिल्हा प्रशासनाच्या मार्फत करण्यात आले.

महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या काही परवानग्या या मोफत दिल्या जाणार असून,.ज्या ठिकाणी परवानगी घेतली आहे त्यांनी फक्त यावेळी संबंधित गणेश मंडळाने माहिती देणे आवश्यक आहे. रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू आहे. महापालिका गणेश उत्सव दरम्यान पाणी, रुग्णवाहिका, रुग्णालयातील उपचार, शहरातील मुख्य ठिकाणी विद्युत रोषनाई विसर्जनाच्या वेळी निर्माल्याचे संकलन करण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे .फिरते शौचालय, वेगवेगळ्या ठिकाणी मूर्ती दान व गणेश मूर्तीचे विसर्जन यासाठी कृत्रिम तलावाची व्यवस्था महापालिकेच्या मार्फत करण्यात आले असल्याचे सांगितले. गणेश उत्सव हा नागरिकांना आनंददायी व्हावा यासाठी महापालिका प्रयत्न करत असून अडचणी असेल तर नागरिकांनी महापालिकेच्या संपर्क कक्षाच्या माध्यमातून मदतही देण्याचे आश्वासन जी. श्रीकांत यांनी दिले.

पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून डीजेमुक्त आणि लेझरचा लाईट वापर न करता गणेश उत्सव साजरा करावा. तसेच समाज माध्यमातून विविध चुकीच्या पोस्ट किंवा माहिती प्रसारित करू नये, जेणेकरून शहर आणि जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनीही एकोपा जपण्यासाठी काम करावे असे आवाहन पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी केले.

## शिवसेना उबाठा गटाचे उपजिल्हा प्रमुख रतनकुमार साबळे यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर – दिनांक २४ रोजी भारतीय जनता पार्टी, शहर जिल्हाध्यक्ष किशोरद शितोळे यांच्या अध्यक्षते खाली आणि केंद्रीय वित्त राज्यमंत्री तथा खासदार डॉ भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टीमध्ये शिवसेना उबाठा गटाच्या रतनकुमार साबळे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश सोहळा संपन्न झाला.

उबाठा गटाचे उपजिल्हाप्रमुख रतन कुमार साबळे, विभागप्रमुख अशोक साळवे, शाखाप्रमुख स्वप्निल साबळे, युनियन अध्यक्ष आनंदराव शेळके, वॉर्ड संघटक सुनिता हिवराळे, वॉर्ड संघटक संगीता गायकवाड, आनंदराव शेळके, स्वप्नील साबळे, संतोष हिवराळे, संतोष भोळे, सिद्धार्थ शेळके, राजू म्हस्के, उत्तमराव जाधव, स्वप्निल धनेधर, सुमित जमधडे, मनोज खोतकर, आकाश सोनकांबळे, सुनील भोंबे, सतीश धनेधर, नानासाहेब गायकवाड मिलिंद बनकर, सुहास साळवे, संघराज वाघ, रवी दाभाडे, राजू जाधव, शेषराव गडवे, अजय धनेधर, शैलेश साबळे, अमर भद्रे, शांतीलाल खिल्लारे, रमेश मगरे, अनिल गायकवाड, गणेश बोर्डे,रंजना मगरे, सीमा सोनवणे, मीना दाभाडे, विशाखा सोनवणे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला

यावेळी भारतीय जनता पार्टी शहर जिल्हा सरचिटणीस हर्षवर्धन कराड,शहर जिल्हा सरचिटणीस ड. ताराचंद गायकवाड, *जालिंदर भाऊ शेंडगे, बबनदादा नरवडे, सिद्धार्थ साळवे,सुनील देहाडे भैय्या* आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. भाजपाचे शहर जिल्हा सरचिटणीस ड. ताराचंद गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे छत्रपती संभाजीनगर विमानतळावर स्वागत

छत्रपती संभाजीनगर – (तभा वृत्तसेवा)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस छत्रपती संभाजीनगर शहराला होणाऱ्या २६ चडऊ पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ करण्यासाठी आले असता, त्यांचे छत्रपती संभाजीनगर विमानतळावर जंगी स्वागत करण्यात आले.

यावेळी विमानतळावर खा. श्री. संदीपानजी भुमरे, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री खा. श्री. भागवतजी कराड, बहुजन विकास, दिव्यांग कल्याण व अपारंपारिक ऊर्जा मंत्री ना. श्री. अतुलजी सावे, सामाजिक न्याय मंत्री ना. श्री. संजयजी शिरसाठ, आमदार, श्री नारायण कुचे, आमदार सौ.अनुराधाताई चव्हाण, प्रसिद्ध उद्योजक श्री. विवेक देशपांडे, शहर जिल्हाध्यक्ष श्री. किशोरदादा शितोळे, प्रदेश सचिव श्री किरण पाटील, माजी महापौर श्री. बापू घडामोडे, माजी महापौर श्री.नंदकुमार घोडेले, माजी उप श्री. प्रमोद राठोड, प्रदेश कार्यकारणी सदस्य श्री. अनिल मकरिये, पश्चिम ग्रामीण जिल्हाअध्यक्ष श्री. संजय खंबायते, उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री. सुहास शिरसाठ, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त श्री. जी श्रीकांत, मनपा उपायुक्त श्री. संतोष वाहुळ, यांच्या सह शहरातील गणमान्य अतिथी उपस्थित होते.

## इलेक्ट्रिक वाहन खरेदीसाठी पुढील पाच वर्षांसाठी १,९९३ कोटीं रुपयांच्या खर्चाची तरतूद - मूर्ती नायर यांचे संशोधन

### १६% भागात प्रदूषण करणाऱ्या वाहनांचा वापर कमी केल्यास, ५ वर्षांत प्रदूषणामुळे होणारा खर्च २३३ कोटीं ने कमी होईल

छत्रपती संभाजीनगर – महाराष्ट्र सरकारने २०२५ साठीची दुसरी इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) पॉलिसी जाहीर केली आहे. ही पॉलिसी कर्नाटकच्या पावलावर पाऊल ठेवून तयार करण्यात आली असून, पुढील पाच वर्षांसाठी तब्बल १,९९३ कोटीं रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यात आली आहे, जी २०२१ च्या ईव्ही पॉलिसीत दिलेल्या ९३० कोटी रुपयांच्या तुलनेत दुपटीहून जास्त आहे. २०२४ मध्ये महाराष्ट्र हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा ईव्ही बाजार होता. त्यामुळे नवीन पॉलिसीत व्यापक उपाययोजना समाविष्ट केल्या आहेत. यात सर्व प्रकारच्या वाहनांच्या खरेदीवर अनुदान (सबसिडी) दिली जाणार आहे – कृषी ट्रॅक्टर आणि हार्वेस्टरलाही यात समाविष्ट केले आहे.या योजनेचे उद्दिष्ट स्पष्ट आहे – २०३० पर्यंत राज्यात नोंदवली जाणारी ३०% नवीन वाहने इलेक्ट्रिक असावीत तसेच वाहन नोंदणी आणि नूतनीकरण शुल्क माफी, महत्त्वाच्या रस्त्यांवर टोल माफी, चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीसाठी मदत आणि स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन यासारख्या सवलतींचाही समावेश असल्याचे मूर्ती नायर यांनी संशोधन केले आहे ते इंटरनॅशनल कौन्सिल फॉर क्लीन ट्रान्सपोर्टेशन मध्ये संशोधक आहेत.

महाराष्ट्राच्या २०२१ च्या ईव्ही पॉलिसीत लो-इमिशन झोन्सचा समावेश हा दूरदृष्टी दाखवणारा आणि नाविन्यपूर्ण निर्णय होता. यामुळे राज्याचा दृष्टिकोन वेगळा ठरला आणि महाराष्ट्र स्वच्छ वाहतुकीत अग्रणी म्हणून उभा राहिला.

२०२५ च्या पॉलिसीत कमी-उत्सर्जन क्षेत्र मध्ये राज्याचा समावेश न केल्याने, राज्याच्या शाश्वत शहरी वाहतुकीसाठीची बांधिलकी आणि सार्वजनिक आरोग्य सुधारण्याची संधी गमावली आहे. हे विशेषतः आरोग्याच्या दृष्टीने गंभीर ठरू शकते, कारण महाराष्ट्रात वायुप्रदूषण वाढत आहे. नॅशनल क्लीन एअर प्रोग्रॅम नुसार, महाराष्ट्रातील १९ शहरे सलग ५ वर्षे राष्ट्रीय हवेच्या गुणवत्तेचे निकष पूर्ण करण्यात अपयशी ठरली असून ती नॉन-अटेनमेंट शहरे म्हणून घोषित केली गेली आहेत. विविध अभ्यासांनुसार, या शहरांतील वाढत्या वायुप्रदूषणामागे वाहतुकीचा मोठा वाटा असून

महाराष्ट्राच्या २०२१ च्या ईव्ही पॉलिसीत सहा शहरांमध्ये लो-इमिशन झोन्स सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले होते, मात्र त्यासाठी ठोस नियोजन व अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन नव्हते. तरीही पिंपरी-चिंचवड, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या तीन शहरांनी इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्टेशन अँड डेव्हलपमेंट पॉलिसी आणि इंटरनॅशनल कौन्सिल ऑन क्लीन ट्रान्सपोर्टेशन यांच्या मदतीने लो-इमिशन झोन्सचे नियोजन सुरू केले.

जर कमी-उत्सर्जन क्षेत्र कडकपणे अंमलात आणले आणि टप्प्याटप्प्याने अधिक कठोर नियम लागू केले, तर २०३० पर्यंत नायट्रोजन ऑक्साईडचे प्रदूषण ६७% आणि पीएम २.५ (सूक्ष्म धूळकण) चे प्रदूषण ७९% पर्यंत कमी होऊ शकते. त्याचप्रमाणे, छत्रपती संभाजीनगरच्या केवळ १६% मध्यवर्ती भागात सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या वाहनांचा वापर प्रतिबंधित लागू केल्यास, पुढील ५ वर्षांत आरोग्य, शेती उत्पादनक्षमता, पर्यावरण आणि पायाभूत सुविधा यांच्याशी संबंधित प्रदूषणामुळे होणारा खर्च तब्बल २३३ कोटीं रुपयांनी कमी होऊ शकतो.

### कन्नडमध्ये बैलपाडव्याच्या मिरवणुकीत शेतकऱ्यावर दगडफेक, डोक्याला गंभीर दुखापत

कन्नड : दि.२४ ऑगस्ट – शहरात रविवारी (दि. २३) बैलपाडव्याच्या मिरवणुकीदरम्यान झालेल्या दगडफेकीने वातावरण ढवळून निघाले. या हल्ल्यात एका शेतकऱ्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून शहरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विठ्ठल कारभारी शिरसे (वय ३२, रा. मुज्याची पट्टी, ता. कन्नड) हे बैलांसह माळीवाड्यातील सार्वजनिक मिरवणुकीत सहभागी झाले होते. सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास मिरवणूक साठे चौकात आली असता अचानक अरमान शेख व शायद शेख या दोघांनी जुन्या कन्या शाळेकडून कोणतेही कारण नसताना दगडफेक केली. या दगडफेकीत शिरसे यांच्या उजव्या कानाजवळील डोक्याला दगड लागून ते रक्तबंबाळ झाले. मिरवणुकीतील उपस्थित नागरिकांमध्ये काही काळ गोंधळ उडाला. जखमी शेतकऱ्याला सोबत असलेल्या अतुल जाधव व कैलास शिरसे यांनी तत्काळ कन्नड पोलिस ठाण्यात आणले. पोलिसांनी तातडीने वैद्यकीय उपचारासाठी घाटी दवाखान्यात दाखल केले. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### कन्नडमध्ये १३.७६ लाखांचा गुटखा जप्त

कन्नड :- दि.२४ ऑगस्ट – तालुक्यातील हातनूर शिवारात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी (दि. २३) सकाळी अवघ्या सहा वाजता अचूक सापळा रचून प्रतिबंधित गुटख्याची मोठी खेप हस्तगत केली. यात तब्बल १३ लाख ७६ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुप्त माहिती मिळताच पोलिसांनी कन्नड-खुलताबाद रस्त्यावर कारवाई केली. इनोव्हा कार (चक-२०-ड-९०९९) थांबवून तपासणी केली असता, विमल पान मसाला व गोवा जर्दा असा सुमारे ६ लाख ७६ हजारांचा गुटखा मिळाला. वाहनासह एकूण किंमत १३ लाख ७६ हजार ९६० रुपये एवढी झाली.

गुटखा वाहतूक करणारा जितेंद्र अशोक कुरलीये (रा. गारखेडा, छत्रपती संभाजीनगर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध अन्नसुरक्षा व मानके कायदा अंतर्गत कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही धाडसी कारवाई पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपुत यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. संतोष मिसळे, पोह. अशोक वाघ, प्रशांत नांदवे, गोपाल पाटील, अनिल चव्हाण, खरात आदींच्या पथकाने केली. या कारवाईनंतर गुटखा तस्करांचे धाबे दणाणले असून, पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखा करत आहे.

### सोयगावातील जय विघ्नहर्ता मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी संदीप चौधरी तर कार्याध्यक्षपदी सचिन चौधरी यांची निवड

सोयगाव,दि.२४ ऑगस्ट – सोयगाव शहरातील चौधरी नगर येथे जय विघ्नहर्ता गणेश मित्र मंडळ यांची मीटिंग घेऊन कार्यकारणी सलाबाजाप्रमाणे जाहीर करण्यात आली आहे.अध्यक्षपदी संदीप चौधरी, उपाध्यक्षपदी निखिल पाटील, कार्याध्यक्षपदी सचिन चौधरी, कोषाध्यक्ष पदी सागर चौधरी,सचिव पदी ऋतिक चौधरी,देवेंद्र चौधरी यांची निवड करण्यात आली आहे तर पुढील सदस्य ज्ञानेश्वर चौधरी,गोपाल पाटील, वैभव चौधरी,धीरज मानकर,ऋषिकेश चौधरी,विश्वेश चौधरी,कुणाल जावळे, आबा जावळे,गुड्डू चौधरी,स्वप्निल चौधरी,कार्तिक चौधरी,विशाल चौधरी,कृष्णा चौधरी,भाग्येश चौधरी, कृष्णा पाटील,यश चौधरी,कुश चौधरी,दिवेश चौधरी,अनिकेत चौधरी, संकेत पाटील,अर्णव बाविस्कर, प्रियांश चौधरी,विराज चौधरी,मोनु मानकर,तेजस चौधरी आदी सदस्य उपस्थित होते.

### एमजीएमच्या प्रेरणा बोराडे – दळवी यांना पीएचडी प्रदान

छत्रपती संभाजीनगर, दि.२४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे आणि मानव्य विद्याशाखेच्या पत्रकारिता व जनसंवाद विषयाची पीएचडी एमजीएमच्या प्रकल्प संचालिका प्रेरणा बोराडे – दळवी यांना प्रदान करण्यात आली. प्रेरणा बोराडे – दळवी यांनी पीएचडी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ.एच.एच.शिंदे, प्राचार्या डॉ.रेखा शेळके व सर्व संबंधित प्राध्यापक व सहकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### जाहीर सूचना

मी, ऋषभ बाळासाहेब जाधव, जन्मतारीख ३०/०४/२००५, रा. मु.पो. पिशोर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर, याचे कळविण्यात येते की पिशोर-कन्नड प्रवासादरम्यान माझे शाळेचे ट्रान्सफर सर्टिफिकेट (टी.सी.) हरवले आहे.

सदर टी.सी. कोणाला सापडल्यास कृपया खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा : ९४२२३३७८४८

हि सूचना मी संबंधित शाळेकडून नवीन / डुप्लिकेट ट्रान्सफर सर्टिफिकेट मिळविण्याकरिता प्रसिद्ध करीत आहे.

दिनांक : २३/०८/२०२५

ठिकाण : पिशोर

J1/4553/25

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
छ. संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर.
19 AUG 2025

### चौकशीची जाहीर नोटीस

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छ. संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर.
अर्ज क्रमांक :- ९७०/२०२३. कलम-किरकोळ

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: बजाजनगर व्यायाम आणि क्रिडा प्रसारक मंडळ बजाजनगर जि. औरंगाबाद नोंदणी क्र. एफ-७७८० (औ).

बाबत, अर्जदार :- Shri. Bhimraj Khaderao Rahane R/o. D-81/5, Cideo, Shivaji Nagar, 11th Scheme Garkheda, Aurangabad.

सर्व संबधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त छ. संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम किरकोळ

# माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारांवरील टांगती तलवार!

**जगात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात सातत्याने बदल प्रवाही असतात. आज जगात सर्वत्र अस्थितरता असतानाही होणारे बदल या क्षेत्रात प्रामुख्याने जाणवत आहेत. त्यातील काही बदल चांगले असले, तरी काही बदलांमुळे कर्मचारी कपातीची नामुष्कीही ओढावत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील या बदलांचा घेतलेला आढावा...**

**व्यवस्थापननिती**
**दत्तात्रय आंबुलकर**

संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील 'टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस' म्हणजेच नावाजलेल्या अशा 'टीसीएस'या आघाडीच्या कंपनीने कर्मचारी कपातीची शक्यता वर्तवली आहे. जागतिक स्तरावर वाढलेली व्यावसायिक अस्थिरता व नजीकच्या काळातील अनिश्चित परिस्थिती लक्षात घेऊन 'टीसीएस' मध्यम व उच्चस्तरीय स्तरांवरील सुमारे १२ हजार कर्मचार्यांना सेवामुक्त करण्याची शक्यता आहे. आजतागयत व्यावसायिकता, व्यवस्थापन आणि कर्मचार्यांप्रति सहानुभूतीपूर्वक भूमिका बाळगणार्या 'टीसीएस'च्या कर्मचारीकपातीच्या निर्णयाचे संभाव्य परिणाम देशातील माहिती तंत्रज्ञान व संगणकीय सेवा क्षेत्रात सर्व स्तरावर उमटणे स्वाभाविक होते.

यासंदर्भात प्रामुख्याने व सर्वप्रथम उमटलेली 'टीसीएस' व्यवस्थापनाची प्रतिक्रिया वर नमूद केली असून, कर्मचार्यांच्या कपातीसंदर्भात आलेली त्यांची प्रतिक्रिया म्हणजेच प्रस्तावित भूमिका होय! ही भूमिका म्हणजे सद्यस्थितीत भारतातील संगणक क्षेत्र आणि संबंधित क्षेत्रातील अस्थिरतेचे द्योतकच समजायला हवी.

या क्षेत्रातील जाणकारांच्या मते, सध्या आपले माहिती तंत्रज्ञान व संबंधित क्षेत्र हे मोठ्या स्थित्यांतरातून जात आहे. यामुळे भारतातील संगणकीय सेवा उद्योगात तंत्रज्ञानापासून माहितीची देवाण-घेवाण, आर्थिक व्यवहार या सार्यांवरच मोठे परिणाम होत आहेत. याचे परिणाम भारतासह जागतिक स्तरावरही होत आहेत. यामध्ये विविध संसाधनांच्या नेमक्या व मोजक्या वापरासह आर्थिक निर्बंधांवर भर देण्यात येत असून, त्याचा अपरिहार्य परिणाम कर्मचारी आणि त्यांच्या संस्थेवर होत आहे.

दरम्यान, संगणक क्षेत्र आणि व्यवसायाला त्यांच्या फायदेशीर अस्तित्वासाठी कार्यालय, कर्मचारी, तंत्रज्ञान व आर्थिक दृष्टिकोन या सर्व बाबींचा साकल्याने विचार करूनच, त्यानुसार ध्येयधोरणाची नव्याने आखणी वा प्रसंगी फेरआखणी करावी लागते. वाढती स्पर्धा हा मुद्दासुद्धा सर्वांसाठी महत्त्वाचाच ठरतो. त्यातच भर पडते ती संगणक सेवा क्षेत्रातील वाढत्या अपेक्षांची! त्यांची पूर्तता करण्यासाठी यापूर्वी न वापरलेल्या उपाययोजनांचा विचार आणि वापर करणे अपरिहार्यच ठरते. यामध्ये कार्यालयीन जागा व कामकाजापासून, कर्मचार्यांच्या कार्यक्षमतेपर्यंत सर्वच मुद्द्यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात येतो.

याचदरम्यान संगणक सेवा क्षेत्रातील अजून एक नामांकित कंपनी असलेल्या 'इन्फोसिस'ने, त्यांच्याकडे कोणतीही कर्मचारी कपात होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. 'इन्फोसिस'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सलिल प्रकाश यांनी जाहीर केलेल्या निर्णयानुसार कंपनीने कृत्रिम बुद्धिमत्ता व कर्मचार्यांच्या नव्या स्वरुपातील कौशल्यविकासाद्वारे, कंपनीच्या कर्मचारी कपातीसंदर्भातील चर्चेला पूर्णविराम दिला आहे. एवढेच नव्हे, तर एकीकडे कर्मचारी कपातीची शक्यता स्पष्टपणे फेटाळून लावतानाच, 'इन्फोसिस' आगामी वर्षभरात सुमारे २० हजार नव्याने उत्तीर्ण झालेल्या संगणक पदवीधरांना प्रशिक्षार्थी म्हणूनही घेणार असल्याची केलेली घोषणा हा सध्या मुख्य चर्चेचा विषय झाला आहे.

कंपनीच्या व्यवसाय आणि व्यवस्थापनाची दिशा स्पष्ट करताना सलिल प्रकाश यांनी स्पष्ट केलेली बाब म्हणजे, नव्या व्यावसायिक गरजा व व्यवस्थापन पद्धती यांचा व्यवसायानुकूल भर देण्यावर त्यांचा भर राहणार असून, कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिकाधिक परिणामकारक वापर करून व्यवसाय वाढवणे हे कंपनीचे उदिष्ट आहे. त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्ता हे क्षेत्र सर्वार्थाने नवे असल्याने, त्यातील कौशल्यपूर्ण कर्मचार्यांची सर्वत्र वानवा आहेच. कौशल्यांच्या संदर्भातील नेमकी हीच गरज व त्याच्याशी निगडित आव्हाने लक्षात घेऊन, कंपनीने नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी उमेदवारांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. याचाच एक भाग म्हणून, नव्या कर्मचार्यांची निवड करण्याच्या पहिल्या टप्प्यात सुमारे १६ हजार प्रशिक्षार्थी कर्मचार्यांची नेमणूक केली जाणार आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

सुरुवातीलाच नमूद केल्यानुसार, सध्या जगाच्या पाठीवर माहिती तंत्रज्ञान उद्योग क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर व्यवसाय, कार्यपद्धती, धोरण, विस्तार, कर्मचार्यांचे प्रश्न यावर मोठ्या प्रमाणावर विमर्श सुरु आहे. त्यानुसार संबंधित कंपनींच्या धोरणात आणि कामकाजाच्या शैलीमध्ये आवश्यक बदल करणे अपरिहार्य ठरत आहे.

संगणक क्षेत्रातील या महत्त्वाच्या बदलांमध्ये प्रामुख्याने पुढील मुद्द्यांचा समावेश करता येईल.

**व्यावसायिक फायद्यासाठीची तीव्र स्पर्धा :** इतर व्यवसायांप्रमाणेच संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान व्यवसायामध्ये स्पर्धा असणे अपरिहार्य असले, तरी सध्या या स्पर्धेची व्याप्ती आणि तीव्रता प्रकर्षाने वाढली आहे. सध्या अधिकाधिक नफा मिळविण्यावरच भर दिला जात असून, त्यासाठी प्रसंगी अतिरेकी व्यावसायिक नीतीपद्धतींचा वापर केला जात आहे.

**व्यावसायिक फेररचना :** बदलत्या व्यावसायिक गरजा, वाढती स्पर्धा व विविध स्वरूपांची आव्हाने या सार्यांना एकाचवेळी तोंड देण्यासाठी व्यवसाय-व्यवस्थापन आणि कंपनी-कर्मचारी या क्षेत्रांची पुनर्रचना करणे सध्या अपरिहार्य झाले आहे. यासाठी उपाययोजना म्हणून, कृत्रिम बुद्धिमता क्षेत्र अग्रक्रमाने पुढे येत आहे. त्याचा वापरही आवश्यकच नव्हे, तर अपरिहार्यपण ठरला आहे.

**कर्मचाऱ्यांचे सोडून जाणे :** कंपन्यांसाठी परिणामकारक स्वरूपाचे काम करणार्या कर्मचार्यांचे राजीनामे हे मोठे आव्हान असते. सद्यस्थितीत व वाढत्या व्यावसायिक स्पर्धेला तोंड देताना, विशेषतः एरव्हीसुद्धा कामाच्या व कौशल्यप्राप्त कर्मचार्यांना टिकवून ठेवणे हे संगणकशास्त्र उद्योगासाठी आवश्यक आहे. तरी सध्या हीच बाब बदलत्या परिस्थितीत या व्यवसाय क्षेत्रासाठी अत्यावश्यक ठरली आहे.

याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाकडे शस्त्र आणि शास्त्र उभय दृष्टिकोन आणि भूमिकांसह पाहाणे गरजेचे आहे. कंपनी, तिचे कामकाज, कर्मचारी या सार्यांसाठीच नव्या बदलांचा अपरिहार्य हिस्सा म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यातूनच कर्मचार्यांची व पर्यायाने कंपन्यांची उपयुक्तता निश्चितपणे व्यवसायपूरक ठरणार आहे.

**(लेखक एचआर-व्यवस्थापन सल्लागार आहेत)**
**९८२२८४७८८६**

# कै.बाबुरावजी काळे(आप्पासाहेब) जन्मशताब्दी विशेष

मराठवाड्याच्या विकासाचे शिल्पकार थोर स्वतंत्र सेनानी माजी मंत्री कै.बाबुरावजी काळे-२५ ऑक्टोबर २०२५ रोजी कै.बाबुरावजी काळे यांची १०० वी जयंती त्यानिमित्ताने विशेष लेख,बाबुरावजी काळे यांचा जन्म मराठवाड्यात एका लहानशा खेड्यात सामान्य कुटुंबात झाला त्यांनी अल्पशिक्षित असूनही मराठवाडा प्रदेशाच्या इतिहासात आढळ स्थान मिळविले,केले ते हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या निमित्ताने युवा किंग मेकर म्हणून मराठवाड्यातील खेड्यापाड्यात परिचित होते.भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात असणाऱ्या ५६५ अवस्थांना पैकी तीन संस्थाने भारतातील झालेले त्यात काश्मीर जुनागढ आणि हैदराबाद यांचा समावेश होता इसवी सन.१७२४ मध्ये हैदराबाद संस्थान मीर काशिम रेल्वे यांनी स्थापन केले होते स्वातंत्र्यपूर्व काळात निजामांची राजवट मराठवाड्यात स्थापन झाली होती ही राजवट हिंदू वर अत्याचार करत होती, हैदराबाद येथील निजावांच्या जुलमी अत्याचारा जो खंडातून बाहेर पडण्यासाठी हैदराबाद मुक्तिसंग्राम लढा मराठवाड्यातील जनतेने एक संघ होऊन लढला स्वाभिमानाचा लढा लढताना जुलमी रजागिरी राजवटी विरुद्ध सामान्य जनतेने केलेला हा मोठा होता मराठवाड्यातील तरुण आणि वैचारिक जागृती करण्यासाठी खेडोपाडी निजामांच्याविरुद्ध पत्रके वाटली जनतेला स्वाभिमानी धडे दिले स्वामी रामानंद तीर्थ नेतृत्वाखाली भारतीय स्वतंत्र्यानंतर हैदराबाद संस्थान भारतात विलीन हवे ही येथील जनतेची मागणी होती मात्र निजामांच्या महत्वकांक्षा धोरणामुळे हैदराबाद संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीन झाले नाही आपल्या संस्थानाला स्वतंत्र्य दर्जा मिळावा या उद्देशाने निजामांच्या सेनापतीने रजाकरी संघटनेला हाताशी धरून मराठवाड्यातील जनतेवर अत्याचार केले लोकांमध्ये दहशत निर्माण केली करण्यासाठी रजाकार संघटना सामान्य जनतेवर अन्याय करत होती कासिम रजा कार्य संघटनेचा प्रमुख म्हणून काम करून पाहू लागला होता त्याचा स्वभाव करून होता त्यांच्या कार्यकाळात मराठवाड्यातील जनतेवर मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार झाले हिंदूंची घरेलुट्टी स्त्रिया व अत्याचार करणे जनतेच्या मालमत्ता लुटणे प्रतिकार करणाऱ्यांना मारणे हि रजाकरांचे सरासरी काम चालू होते या अन्याय अत्याचाराचे विरोधात स्वामी रामानंद तीर्थ यांचे नेतृत्वाखाली गोविंद भाई सराव विजेंद्रजी काबरा अग्रवाल मध्ये भाऊसाहेब ५५५ दगडाबाई शेळके,काशिनाथ कुलकर्णी व कैलास वाशी बाबुरावजी काळे यांनी मराठवाड्यातील तरुणांना संघटित करण्याचे कार्य केले यासाठी गुप्त भेटायला घेणे तरुण पिढीला जागृत करणे निजामविरुद्ध पत्रक वाटणे या कामात औरंगाबाद येथील बाबुरावजी काळे यांचे मराठवाड्यातील युवा किंग मेकर म्हणून खेड्यापाड्यात मोठे काम होते बाबुरावजी काळे यांनी मराठवाड्यातील जनतेला स्वाभिमानाची धडे देऊन मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यात तरुणांचे फळी निर्माण केली निजामांनी केलेल्या अत्याचाराच्या विरोधात सर्व लोकांना एकसंघ झाल्याशिवाय आपल्याला स्वातंत्र्य मिळणार नाही यासाठी हैदराबाद मुक्तिसंग्राम आंदोलनात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली वंदे मातरम चळवळीत १९३८ पासून तरुणांना संघटित करण्याचे काम त्यांनी सुरू केले अजिंठा परिसरातील सोयगाव,सिल्लोड बनोटी,जरंडी, फर्दापूर,पानवडोद पालोद,धोतरा,या गावातील तरुण सहकार्यानि सोबत घेऊन निजाम राजवटीविरुद्ध गावाकडे गुप्त बैठका घेऊन सामान्य जनतेला आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले.यासाठी त्यांना पानवडोद चे भिकाजी पाटील यांच्यासोबत भूमिगत राहून आपल्या सहकाऱ्यांना अन्नधान्य पुरविणे, स्वातंत्र्य सैनिकांना हत्यारे पुरवणे त्यांना आर्थिक रसद पोहचविण्याचे काम बाबुरावजी काळे करीत होते.या कामात त्यांना दादाजी पाटील. चंद्रगुप्त चौधरी यांची साथ लाभली,पालोद गावचे गंगाराम मानकर गोविंद चोबे,जयवंतराव दौड, धोत्र्याचे गुलाबसिंग नवल सिंग तसेच बाजीराव पाटील,सोयगाव येथील लक्ष्मण पवार,होनसिंग हजारी, पंढरीनाथ देसाई,विश्वनाथ पिंगळकर, भुजंगराव जाधव,लक्ष्मण श्रीवास्तव,कन्हैया हजारी,विठ्ठल देसाई व औरंगाबाद येथील लक्ष्मीनारायण जयस्वाल,दादासाहेब गणोरकर या युवा सैनिकांची साथ त्यांना मिळाली हैदराबाद मुक्तिसंग्राम चळवळीमध्ये अहोरात्र परिश्रम घेत,सामान्य माणसाला एकत्र करून निजामाच्या विरुद्ध लोकांना गावोगावी एकत्र करण्याचे काम बाबुरावजी काळे यांनी केले, मराठवाडा मुक्तीसंग्राम लढ्यातील सैनिकांना बंदुका चालवण्यासाठी शिक्षण देण्याचे काम,निजामाविरुद्ध गुप्त पत्रक वाटणे,निषेध सभा घेणे, वर्तमानपत्रे गावागावी सायकलवर जाऊन वाटणे हे काम करीत असताना,निजामांच्या सैन्याने बाबुरावजी काळे यांना पकडले व औरंगाबाद येथील हर्सूल जेलमध्ये राजकीय कैदी मधून त्यांना तीन वर्षे तुरुंगवास भोगावा लागला,याच दरम्यान त्यांनी हर्सूल येथील कारागृह फोडून बाबुरावजी काळे आपल्यासहकार्या सोबत सीताफिने बाहेर पडले,पुढे त्यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेस मध्ये तसेच आर्य समाज चळवळीच्या माध्यमातून मराठवाड्यात मोठे संघटन उभा केले,बाबुराव काळे हे मराठवाड्यातील तरुणाला संघटित करून हैदराबाद मुक्तिसंग्रामाच्या परिषदा घेण्यासाठी कार्य करीत होते,या कामामुळे त्याचा मराठवाड्यातील आनंत राव भालेराव, उद्धवराव पाटील,आशाताई वाघमारे, काशिनाथ जाधव,भाऊसाहेब वैश्यपन,व्यंकटराव जाधव,जनार्दन मामा,सूर्यभान पवार,शंकरराव धोंडगे,अशा अनेक स्वातंत्र्य सैनिकाचा त्यांचा संबंध आला, मराठवाडा मुक्ती संग्राम लढत ज्यांनी भाग घेतला त्यांची फारशी नोंद नसलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनात स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी बाबुरावजी काळे यांनी एक उच्च अधिकार समिती स्थापन केली,या समितीद्वारे खेड्यापाड्यातील नोंद नसलेल्या स्वातंत्र सैनिकांना सन्मानाने जगता यावे म्हणून त्यांची स्वातंत्र्यसैनिक म्हणून शासन दरबारी नोंद होण्यासाठी बाबुरावजी काळे यांनी विशेष प्रयत्न केले.बाबुरावजी काळे यांनी सक्रिय राजकारणात १९४०-४१ पासून सहभाग घेतला ते त्या वेळच्या सोयगाव स्कूल बोर्ड चे सचिव होते,त्यांनी सोयगाव च्या सहकारी संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्य केले त्यांचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग होता,महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून १९६१ मध्ये ते औरंगाबाद जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष झाले,ते १९६२ मध्ये विधानसभेवर प्रथम निवडून आले,१९७१ मध्ये जालना लोकसभा मतदारसंघातून निवडून आले,काँग्रेस पक्षावर त्यांची आढळनिष्ठ होती,महाराष्ट्राचे मंत्रिमंडळात त्यांनी ए.आर. अंतुले, बाबासाहेब भोसले,शंकरराव चव्हाण, शिवाजीराव निलंगेकर,यांच्या मंत्रिमंडळात एक यशस्वी मंत्री म्हणून सहकार,शिक्षण,परिवहन,गृह,तुरुंग, ग्रामविकास,खात्यावर त्यांचा प्रभाव होता.बाबुरावजी काळे यांनी ग्रामीण भागातील शिक्षणाच्या प्रचाराची गरज लक्षात घेता १९७१ मध्ये अजिंठा शिक्षण संस्था स्थापन केली,या संस्थेने सोयगाव येथे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय व औरंगाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय सुरू केले,तात्कालीन मराठवाडा विद्यापीठ, मराठवाडा कृषि विद्यापीठ,सहकारी साखर कारखाने,सहकारी बँक स्थापन करण्यात त्यांचा मोठा वाटा होता.जायकवाडी धरण उभारण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग राहिला, इंदिरा गांधींचा १९७७ मध्ये प्रचंड पराभव झाला,अनेक रथी महारथी इंदिरा गांधी यांना सोडून गेले पण बाबुरावजी काळे यांनी इंदिरा गांधीजींची खंबीर साथ दिली, इंदिराजींच्या मनात यामुळे शेवटपर्यंत त्यांच्याबद्दल आदराची भावना होती, त्यांचीच पावती म्हणून १९८० मध्ये प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांना दिली.बाबुराव काळे यांनी मराठवाड्यात आर्थिक सुबत्ता आल्याशिवाय जनतेचा सर्वांगीण विकास होणार नाही हे लक्षात घेऊन सहकार चळवळ राबवली,त्यासाठी त्यांनी जिल्हा भूविकास बँक,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,सहकारी सूतगिरणी,सहकारी पतसंस्था, सहकारी साखर कारखाने उभारले,औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा भूविकास बँकेचे संस्थापक अध्यक्ष राहिले,सहकारी बोर्डाचे संस्थापक अध्यक्ष,कामगार संघटनेचे अध्यक्ष,तसेच औरंगाबाद येथे २८ एकरात गारखेडा परिसरातील सूतगिरणीचे संस्थापक,म्हणून त्यांनी हजारो कामगारांना काम दिले,आज त्याच सूतगिरणीच्या जागेवर विस्तीर्ण विभागीय क्रीडा संकुल उभा आहे. बाबुरावजी काळे यांनी सहकार मंत्री असताना मराठवाड्यात तसेच पश्चिम महाराष्ट्रात सहकारचे जाळे उभारले, त्यांनी विधेयक राजकारणाच कृतिशील आदर्श समाजाला घालून दिला.त्यांच्या नेतृत्वामुळे मराठवाड्यातील सहकार क्षेत्राचा मोठा विकास झाला होता.बाबुरावजी काळे यांनी केवळ सामाजिक क्षेत्रातच नव्हे तर साहित्य आणि कलेच्या क्षेत्रात मोलाचे कार्य केले. त्यांनी वृत्तपत्र क्षेत्रात शिवबा हे साप्ताहिक सुरू केले.त्यांचा पत्रकारितेचा पिंड असल्यामुळे ते खासदार होते.तेव्हा मराठवाड्यातील खासदारांचे दिल्लीत नेतृत्व करीत असत.दिल्ली येथील मराठी पत्रकाराबरोबर त्यांचे अनौपचारिक जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते.दिल्लीत मराठी मनांचा खासदार म्हणून ते पत्रकारांला जवळचे वाटत होते, त्यांनी कलेच्या क्षेत्रातही मराठवाडा साहित्य परिषद, साहित्य कला मंडळ,उर्दू साहित्य अकादमी,या संस्थेत सक्रिय कार्य केले,त्यांचे नाट्य क्षेत्रात मोठे योगदान राहिले,सोयगावला नाट्य पंढरी निर्माण करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.त्यांचा अनेक नाटकरांसी जिव्हाळ्याचा संबंध होता.दामू अण्णा,बापूराव गोखले,लोटू पाटील,शरद तळवळकर,जयराम शिलेदार,यांच्याशी त्यांचा चांगला स्नेह होता.बाबुरावजी काळे यांचा मराठवाड्याच्या सर्वांगिन विकासात महत्वपूर्ण सहभाग राहिला.बहुजन समाजाच्या प्रश्नाची जाणीव असलेला एक जाणता नेता,सहकार,शिक्षण, साहित्य,नाट्य या क्षेत्रात काम असणारे नेते म्हणून ते प्रसिद्ध होते,स्वातंत्र सैनिक म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय ठरले, मराठवाड्याच्या विकासाचे शिल्पकार म्हणून त्यांची ओळख आहे त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त कोटी कोटी प्रणाम..... ! ...

**– प्रा.डॉ.भास्कर टेकाळे,संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव,मो.न.८६२४९५२९३६.**

■

# मोनोचा जागतिक प्रवास

**जगाच्या पाठीवर**
**गायत्री श्रीगोंदेकर**

नुकत्याच मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईतील लोकलसेवा आणि 'बेस्ट'ची बससेवा विस्कळीत झाली. अशा वेळी मुंबईकरांना अखंडित सेवा देण्यात 'मेट्रो' आणि 'मोनो' रेल्वेसेवेने मोठा हातभार लावला. मात्र, अचानक मोठ्या संख्येने प्रवासी एकाचवेळी मोनोमध्ये चढल्याने प्रवाशांच्या अतिरिक्त भारामुळे मोनो बंद पडली. यामुळे, आधीच घरघर लागलेल्या या मोनोच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. मात्र, जगभरात किरकोळ तांत्रिक बिघाड वगळता, मोनो रेल्वेच्या कोणत्याही मोठ्या दुर्घटनेचे उदाहरण नाही.

२०२४ मध्ये जागतिक मोनोरेल बाजारपेठेचा आकार ६.६८ अब्ज अमेरिकन डॉलर्स होता आणि २०३४ पर्यंत तो सुमारे १०.१३ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. २०२५ ते २०३४ पर्यंत ४.२५ टक्क्यांच्या 'सीएजीआर'ने हा आकार वाढेल. सार्वजनिक वाहतुकीची वाढती मागणी, पर्यावरणीय शाश्वतता आणि वाढती गुंतवणूक हे मोनोरेल बाजारपेठेच्या वाढीचे प्रमुख घटक. अशातच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) प्रगत वैशिष्ट्यांद्वारे रेल्वे आणि वाहतूक प्रणालींमध्ये क्रांती घडवून आणत आहे. 'एआय' आणि 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' (आयओटी) रेल्वेमध्ये झपाट्याने डिजिटलायझेशन घडवून आणत आहे. पारंपरिक रेल्वे प्रणालींना तोंड द्यावे लागणार्या अनेक आव्हानांवर 'एआय'द्वारे मात करणे शय आहे. मोनोरेल सिस्टममध्ये 'एआय' एकत्रित केल्याने लोकोपायलट अनेक अडथळे शोधून ते रोखू शकतात. २०२४ मध्ये मोनोरेलच्या जागतिक बाजारपेठेत हिंद-प्रशांत महासागरातील क्षेत्राने महसूल वाट्यात ४० टक्क्यांपेक्षा जास्त योगदान दिले.

मोनोरेल सिस्टम मार्केटमध्ये चीनचा मोठा वाटा. वाढती लोकसंख्या आणि जलद शहरीकरणामुळे मोनोरेलसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची मागणी वाढताना दिसते. मोनोरेल सिस्टमच्या विकासासाठी सरकारचा मजबूत पाठिंबा बाजारपेठेच्या वाढीस पोषक ठरतो. स्मार्ट तंत्रज्ञानाच्या एकत्रीकरणासारख्या तांत्रिक प्रगतीमुळे बाजाराच्या वाढीस मदत होते. प्रगत पायाभूत सुविधांच्या विकासात वाढती गुंतवणूक आणि विद्यमान मेट्रो लाईन्सशी एकात्मता यामुळे बाजारपेठेतील गुंतवणुकीत वाढ होते.

मार्च २०१९ मध्ये, भारताने मुंबईत आपला पहिला मोनोरेल प्रकल्प पूर्ण केला. सप्टेंबर २०२३ पर्यंत, अमेरिकेत १६, तर कॅनडात सहा मोनोरेल सिस्टम वापरात आहेत. तसेच युरोपमध्येही मोनोरेल सिस्टम लक्षणीय दराने वाढत आहे.

मोनोरेल एकावेळी फक्त चार ते सहा डबे आणि काही ठिकाणी आठ डबे वाहून नेण्यास सक्षम आहे. जगात अनेक ठिकाणी मोनोरेलचा वापर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत केला जातो. चीन, मलेशिया, जपान, इराण, जर्मनी, नायजेरिया, ऑस्ट्रेलिया अशा विविध देशांत मोनोरेल सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका निभावते.

जगात दोन प्रकारच्या मोनोरेल अस्तित्वात आहेत. त्यांपैकी एक 'स्ट्राडेल मोनोरेल' आणि 'सस्पेंडेड मोनोरेल.' मुंबईत पहिल्या प्रकारची मोनो धावते. या प्रकारच्या मोनोरेलमध्ये गाडी एका बीमवरून धावते. या गाडीला बीमवर पसरलेले 'वॉकिंग व्हिल्स' असतात, त्याबरोबरच 'गायडिंग व्हिल्स' आणि 'स्टॅबलायझिंग व्हिल्स'ही असतात, जे बीमच्या दोन्ही बाजूला धरून ठेवतात. या प्रकारची गाडी छोटी जागा असलेल्या दाट शहरी भागातील वाहतुकीसाठी उपयुक्त ठरते. त्याबरोबरच डोंगरी भाग, किनारी वस्त्या इथेही ही गाडी उपयुक्त आहे.

जलद शहरीकरण, वाढती वाहतुककोंडी आणि वाढती लोकसंख्या हे जगातील मोनोरेल बाजारपेठेच्या वाढीला लक्षणीय चालना देईल, अशी अपेक्षा आहे. जलद शहरीकरण, दैनंदिन प्रवाशांची संख्या वाढणे, रस्त्यावरील वाहतुककोंडी वाढणे आणि लहान जागांची उपलब्धता यामुळे सरकार मोनोरेल प्रणालींना प्राधान्य देत आहेत. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये मोनोरेल सिस्टम चा वाढता वापर पाहता, मोनोरेल सिस्टम बाजारपेठेचे भविष्य आशादायक आहे. भारत, सौदी अरेबिया, मलेशिया, सिंगापूर, थायलंड इत्यादी विकसनशील देश त्यांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा भाग म्हणून सक्रियपणे मोनोरेल सिस्टम बसवत आहेत. अशा देशांची सरकारे लोकांची जीवनशैली सुधारण्यासाठी अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू करतात. ते मोनोरेल सिस्टमच्या विकास आणि वापराला गती देण्यासाठी निधी देऊनदेखील योगदान देतात.

# कर्जरोख्यांत गुंतवणुकीत उदासीनता का?

**अर्थ वृत्तांत**
**शशांक गुळगुळे**

**एकीकडे शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीत महिन्याकाठी वृद्धी होत असताना, भारतीय सर्वसामान्य गुंतवणूकदारांची खासगी कर्जरोख्यांमधील गुंतवणूक तुलनेने कमी आहे. यामागील एक कारण म्हणजे, कर्जरोख्यांविषयीची सर्वसामान्य गुंतवणूकदारांना असलेली शून्य किंवा अत्यल्प माहिती. म्हणूनच आजच्या लेखातून कर्जरोख्यांमधील गुंतवणुकीविषयी केलेले हे मार्गदर्शन...**

सरकार काही कंपन्या निधी उभारणीसाठी कर्जरोखे (बॉण्ड्स) विक्रीस काढतात. या कर्जरोख्यांवर बँकांच्या मुदतठेवींच्या तुलनेत परतावाही जास्त दिला जातो. या कर्जरोख्यांच्या शेअरमध्ये परिवर्तन होत नाही, हे अपरिवर्तनीय कर्जरोखे असतात. मुदतीअंती गुंतवणूकदाराला मूळ रक्कम परत केली जाते व ठरलेल्या कालावधीत व्याजही दिले जाते. भारतीय कर्जरोख्यांचा बाजार आता २२६ लाख कोटी रुपये आहे. यांपैकी ६२ हजार, ४३१ कोटी रुपये परकीय गुंतवणूकदारांची गुंतवणूक भारतीय कर्जरोख्यांत आहे. मागील दहा वर्षांत कर्जरोखे बाजारात भारताने आमूलाग्र प्रगती केली आहे. तरीही भारतीय सर्वसामान्य गुंतवणूकदारांची खासगी कर्जरोख्यांमधील गुंतवणूक अत्यंत कमी आहे. सरकारी कर्जरोख्यांबरोबरच खासगी कंपन्यांच्या कर्जरोख्यांमध्ये पुन्हा सर्वसामान्य गुंतवणूकदार मागेच आहे.

भारतीय संस्थात्मक गुंतवणूकदारांना कर्जरोखे आणि त्यामधील गुंतवणूकही तशी काही नवी नाही. परंतु, मागच्या दोन-तीन वर्षांतील घडामोडी पाहता, भारत सरकारने जागतिक स्तरावर कर्जरोख्यांच्या गुंतवणुकीत मोठी झेप घेतलेली दिसते. 'जेपी मॉर्गन ग्लोबल बॉण्ड इंडेक्स'मध्ये सध्या दहा टक्के 'वेटेज' भारतीय कर्जरोख्यांना आहे. त्यानंतर 'ब्लूमबर्ग बॉण्ड इंडेक्स'मध्येसुद्धा येत्या काही वर्षांत ते सामील होण्याची शक्यता आहे. एखादा देश जेव्हा आर्थिकदृष्ट्या संपन्न होण्याच्या मार्गावर असतो, तेव्हा तो देश विविध मोठ्या सरकारी गुंतवणुकीसाठी पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी सरकारी कर्जरोख्यांचाच आधार घेऊन गुंतवणूक करत असतो आणि पुढे जात असतो. व्याजदर कमी होत असताना खासगी कंपन्यांना कर्ज घेण्यापेक्षा कर्जरोखे विक्रीस काढून पैसा उभा करणे जास्त सोयीचे वाटते. यामुळे कंपन्यांना विस्तार करण्यासाठी लागणारा पैसा सर्वसामान्य गुंतवणूकदारांकडून गोळा केला जातो.

'इकोनॉमिक सर्व्हे, २०२५'च्या आकडेवारीनुसार, परकीय गुंतवणूकदारांनी विविध प्रकारच्या २९ कर्जरोख्यांमध्ये गुंतवणूक केली आहे. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक सरकारी कर्जरोख्यांमध्ये केली आहे. परदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरचा विश्वास वाढत चालला आहे. 'इमर्जिंग मार्केट'मधील इतर अर्थव्यवस्थांपेक्षा भारतीय रुपयाचे डॉलरच्या तुलनेत स्थिर असलेले मूल्य, स्थिर परंतु वाढत जाणारा 'जीडीपी', महसूल तूट जास्तीत जास्त कमी करण्याचे भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रयत्न या आणि अशा इतर विविध धोरणांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेतील त्रुटी कमी करून जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याची धडपड या सर्व गोष्टींमुळे परदेशी गुंतवणूकदारांची सरकारी कर्जरोख्यांमध्ये गुंतवणूक वाढत आहे. भारतीय सर्वसामान्य गुंतवणूकदारांची खासगी कर्जरोख्यांमधील गुंतवणूक फार कमी आहे. सध्या भारतीय सर्वसाधारण गुंतवणूकदार म्युच्युअल फंड योजनांच्या मागे लागले आहेत. सरकारी कर्जरोख्यांबरोबरच खासगी कंपन्यांच्या कर्जरोख्यामध्ये गुंतवणुकीची रक्कम कमीतकमी दहा हजार रुपये करण्यात आली आहे. कर्जरोख्यांच्या मार्केटमध्ये खरेदी आणि विक्री यांचे प्रमाण पाहिजे त्या पद्धतीने वाढलेले नसल्यामुळे गुंतवणूकराराला पाहिजे त्या वेळेस बॉण्डची विक्री करून पैसा मिळत नाही. यामुळे सर्वसामान्य गुंतवणूकदार यात गुंतवणुकीत उदासीन आहेत. आता रिझर्व्ह बँकेने स्वतःचे मोबाईल ॲप आणि पोर्टल असल्यामुळे या गुंतवणूकदारांसाठी चांगली सोय निर्माण केली आहे.

सरकारी रोखे, कॉर्पोरेट रोखे, ट्रेझरी बिल्स, झिरो कुपन रोखे, परिवर्तनीय रोखे, कॉलबेल रोखे, ग्रीन बॉण्

# श्री वैद्यनाथ मंदिरातील तीनही नंदींची बैलपोळा निमित्त आकर्षक फुलांनी सजावट

**तभा वृत्तसेवा**

**परळी वैद्यनाथ दि.२४ ऑगस्ट** देशातील पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथ भगवानाचे वैभव आणि महिमा सांगताना मंदिरातील तीन नंदींचा उल्लेख नक्कीच केला जातो. प्राचीन काळापासून प्रभूच्या पिंडीसमोर वृषभ, चैन व चंड असे तीन नंदी विराजमान असून त्यांची परंपरा आजही कायम आहे. विशेष म्हणजे, श्रावण महिन्याचा शेवटचा दिवस व शेतकरी राजाचा सर्वात मोठा उत्सव बैलपोळा यानिमित्ताने या तीनही नंदींची आणि भगवान श्री विरभद्र व श्री काशी विश्वनाथ यांची भव्य, दिव्य व आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली.

मंदिराचे पुजारी श्री विवेक शंकर पुजारी गुरव व श्री स्वप्नील गणेश पुजारी यांनी या देवतांची श्री अलंकार पूजा भक्तिभावाने साकारली. गुलाब, झेंडू, मोगरा, कमळ, रजनीगंधा यांसारख्या विविध रंगीबेरंगी फुलांच्या मनोहारी आरासीत सजलेले नंदी भक्तांचे लक्ष वेधून घेत होते. विशेष आरास, दिव्य प्रकाशयोजना आणि घंटानादाने मंदिर परिसर भाविकांच्या हर हर महादेव घोषणांनी दुमदुमून गेला होता.यावेळी मंदिराचे पुजारी श्री विवेक शंकर पुजारी व श्री स्वप्नील गणेश पुजारी म्हणाले की, बैलपोळा हा शेतकरी समाजाच्या जीवनातील अतिशय महत्त्वाचा सण आहे. नंदी हा भगवान शंकराचा वाहन असून शेतकरी बैलाला देवत्व मानतो. म्हणूनच बैलपोळ्याच्या दिवशी नंदी सजावटीला विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त होते. आज हजारो भाविकांनी दर्शन घेऊन समाधान व आनंद व्यक्त केला. शेतीला आधार देणार्या बैलांचा सन्मान करण्याचा दिवस म्हणजे बैलपोळा. या पार्श्वभूमीवर नंदी सजावटीचे महत्त्व अधिक अधोरेखित होत असल्याचे भाविकांचे म्हणणे आहे. शेतकरी समाजाची ही परंपरा शतकानुशतके जिवंत ठेवणारा बैलपोळा उत्सव आणि त्याच दिवशी प्रभू वैद्यनाथाच्या समोर सजवलेले नंदी, या दोन गोष्टींचा सुंदर संगम भक्तांना भाविकतेने भारावून टाकणारा ठरत आहे. आज दिवसभरात हजारो भाविकांनी प्रभू वैद्यनाथाचे तसेच नंदींचे दर्शन घेऊन आपल्या कुटुंबासाठी सुख, समृद्धी आणि शेतीला बळ मिळावे यासाठी प्रार्थना केली. मंदिर परिसरात भाविकांच्या गर्दीने उत्सवी वातावरण अनुभवायला मिळाले.



छायाचित्रकार कृष्णा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना संपादक राजेंद्र आगवान, श्रीकांत कुलकर्णी, शैलेश श्रृंगारे, अनिस बेग

## मातृभूमी प्रतिष्ठानकडून डॉ.दाभोळकर यांना विनम्र अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.२४ ऑगस्ट**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ .नरेंद्र दाभोळकर यांच्या बाराव्या पुण्यतिथीनिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य डी .जी.तांदळे व आम्रपाली साबळे यांच्या हस्ते डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी डी.जी. तांदळे म्हणाले की ,संविधानातील कलम ५१ अ मध्ये दिलेल्या नागरिकांच्या कर्तव्या पैकी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार, प्रचार व प्रसार करणे ही कर्तव्य पूर्ण करण्यासाठी डॉ नरेंद्र दाभोळकरांनी आयुष्यभर विज्ञान प्रसाराचे व अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याचे स्मरण करण्यासाठी २०१४ सालापासून २० ऑगस्ट हा दिवस देशभर वैज्ञानिक दृष्टिकोन दिवस म्हणून आयोजित केला जातो .या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या निघृण हत्ते च्या घटनेस २० ऑगस्ट २५ रोजी बारा वर्षे पूर्ण झाली आहेत .तरी अद्यापही त्यांच्या खुणा मागील मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आलेली नाही. डॉ. दाभोळकरांना त्यांचे विचार संपविण्यासाठी केलेला एक सुनियोजित कट होता .असे निरीक्षण पुणे येथील सत्र न्यायालयाने नोंदविले असताना देखील त्यामागचे सूत्रधार शोधण्यासाठी शासन काहीही प्रयत्न करत नाही. कॉ. गोविंद पानसरे, प्रा.एम.एम. कुलबुर्गी आणि गौरी लंकेश यांचे खून खटले देखील अजून सुरू असल्याचे या चारीही खुना मागील सूत्रधारावर कारवाई होऊ शकलेली नाही. या चारही सूत्रधारांचा शोध घेऊन तात्काळ अटक करून कडक कारवाई करण्यात यावी असेही मत यावेळी त्यांनी व्यक्त केले अनिष्ट परंपरांच्या विरोधात लोकशाही पद्धतीने लढा चालू ठेवण्याचा ही संकल्प यावेळी त्यांनी केला. यावेळी कार्यक्रमास डी.जी. तांदळे, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे,बीड शहर बचाव मंचचे निमंत्रक नितीन जायभाये, लेक लाडकी अभियान चे अध्यक्ष बाजीराव ढाकणे, श्याम मार्कंडे,शुभम मुंडे ,पत्रकार समीर काजी आदी उपस्थित होते.

## पं.विष्णू दिगंबर पलुसकर यांना आदरांजली कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.२४ ऑगस्ट**

द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय, बीड येथे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत क्षेत्रातील महान गायक व ग्वाल्हेर घराण्याचे आचार्य पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात पलुसकरांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेण्यात आला. त्यांच्या ग्वाल्हेर घराण्याशी असलेल्या नात्याची, संगीताच्या प्रसार-प्रचारासाठी केलेल्या प्रयत्नांची, 'गंधर्व महाविद्यालय' स्थापनेची तसेच 'पलुसकर पद्धती' स्वरलेखनाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री. लाहोटी ,एस. के. उपमुख्याध्यापक श्री. हावळे ,ए. ए. पर्यवेक्षक श्री. मालपाणी एन. आर. तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. विभाग प्रमुख श्री वाघमारे सर, श्री तौर सर ,सौ. बाहेती मॅडम यांनी भावपूर्ण गीते सादर कली. तसेच कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन श्री. सावंत सर यांनी केले. संगीत क्षेत्रातील पलुसकरांचे कार्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावे, या उद्देशाने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.या उद्देशाने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## सोमवारी ज्ञानेश्वर महाराज मस्के यांची प्रवचन सेवा

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.२४ ऑगस्ट**

बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे.

या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २५/८/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प ज्ञानेश्वर महाराज मस्के यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणार असून, या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## लिंबागणेश परीसरात मुग काढणीला वेग

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.२४ ऑगस्ट**

मृग नक्षत्रात पेरणी झाल्यानंतर उत्पादनाची हमी असल्याने यंदा मुग-उडीद या पिकांचे क्षेत्र लक्षणीय वाढले आहे. सोयाबीनला पर्याय म्हणून शेतकऱ्यांनी मुगाला प्राधान्य दिले असून प्रारंभीच्या सततच्या पावसामुळे पिकांची वाढ समाधानकारक झाली. परंतु ऐन काढणीच्या वेळी झालेल्या भीज पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. सध्या लिंबागणेश शिवारात मुग काढणीला वेग आला आहे. मात्र गेल्या आठवड्यातील रिमझिम पावसामुळे मजुरांचे काम खंडित होत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. भिज पावसाने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना आता मजुरांच्या टंचाईचा व अधिक मजुरीच्या मागणीचा सामना करावा लागत आहे.लिंबागणेशचे शेतकरी बालासाहेब जाधव यांनी सांगितले की,मुग काढणीसाठी मोठ्या प्रमाणावर मजुरांची गरज असते. हिश्शेवारी पद्धतीने २ हिस्सा शेतमालकाला व १ हिस्सा मजुरांना असा व्यवहार होतो. पण मजुरांना आणणे-नेणे याचा खर्च शेतकऱ्यालाच करावा लागतो. त्यातच काढणीस विलंब झाल्याने शेंगा फुटणे, मुग पांढरा पडणे व कर येणे यामुळे पिकांचे नुकसान होत आहे. मजुरांची कमतरता आणि त्यांच्या वाहतुकीवरील खर्चामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक भुर्दंड पडत असून मुग काढणीच्या हंगामात शेतकरी हतबल झाल्याचे चित्र सध्या लिंबागणेश परिसरात पाहायला मिळत आहे.

## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत लोकमत बीड भूमिपूत्र पुरस्काराने विजयकांत मुंडे सन्मानित

विजयकांत मुंडेंच्या विविध क्षेत्रातील कार्याचा गौरव..

**तभा वृत्तसेवा**

**केज दि.२४ ऑगस्ट**

राजकारण,समाजकारण,शिक्षण,क्रीडा,आरोग्य,प्रशासन,कृषी,उद्योग,वैद्यकीय अशा क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना लोकमत भूमिपुत्र पुरस्काराने सन्मानित केले जाते.यावर्षी बीड जिल्यातील केज तालुक्यातून विडा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृष्णा अर्बन बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे यांना लोकमत भूमिपुत्र पुरस्काराने राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे,माजी मंत्री एडिटर इन चीफ लोकमत मीडियाचे राजेंद्र दर्डा व संपादक नंदकुमार पाटील सर यांच्या शुभहस्ते बीड भूमिपूत्र पुरस्काराने छत्रपती संभाजीनगर येथे सन्मानित करण्यात आले.

ऐतिहासिक भूमितील कार्यसम्राटांचा गौरव बीड लोकमत भूमिपुत्र पुरस्कार नूकतेच जाहीर करण्यात आले होते.शनिवार दिनांक - ४:४५ वाजता लोकमत भवन जालना रोड छत्रपती संभाजीनगर येथे राजस्थानचे महामहिम राज्यपाल मा.श्री.हरिभाऊ बागडे व माजी मंत्री एडिटर इन चीफ लोकमत मीडियाचे मा.श्री राजेंद्र दर्डा,संपादक नंदकुमार पाटील सर यांच्या शुभहस्ते राजकारण, समाजकारण,शिक्षण,प्रशासन,सहकार,व सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल विडा गटाचे लोकप्रिय माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन मा.श्री.विजयकांत मुंडे व प्रा.माधुरीताई मुंडे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

बीड लोकमत भूमिपुत्र पुरस्कार मला प्राप्त झाला.आपण सर्वजणांनी माझ्यावर टाकलेला विश्वास सेवा करण्याची दिलेली संधी त्यामुळेच हे सर्व शक्य झाले.हा सन्मान माझ्यावर प्रेम करणार्या प्रत्येक व्यतिचा आसून हा पुरस्कार तुम्हा सर्वांना अर्पन करत आहे.

विजयकांत मुंडे

माजी जि.प.सदस्य बीड तथा चेअरमन कृष्णा अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लि.केज

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# फिट इंडिया मोहीमेंतर्गत पोलिस दलातर्फे सायकलथॉन स्पर्धा

## पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दाखवली हिरवी झेंडी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ ऑगस्ट**

भारत सरकारच्या क्रिडा विभागाच्या निर्देशानुसार व 'फिट इंडिया' मोहिमेअंतर्गत हिंगोली जिल्हा पोलिस दल आणि राज्य राखीव बल गट क्रमांक १२ तर्फे रविवारी सायकलथॉनचे यशस्वी आयोजन करण्यात आले. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हिरवी झेंडी दाखवून या रॅलीचा शुभारंभ केला.

यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, डीवायएसपी अंबादास भुसारे, होम डीवायएसपी दत्ता केंद्रे, राज्य राखीव पोलिस दलाचे आरबी दामन, पीव्ही नरवाडे, एसएच पवार आणि इतर अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सकाळी ७ वाजता संत नामदेव पोलिस व्यायाम मैदानावरून सुरू झालेली ही सायकल रॅली शिवाजी महाराज चौक, रिसाला बाजार नाका, अकोला बायपास, गारमाळ, खटकाळी बायपास, नांदेड नाका, इंदिरा गांधी चौक या मार्गाने पुन्हा संत नामदेव पोलिस व्यायाम मैदानावर येऊन संपली. या सायकलथॉनमध्ये एसआरपी आणि पोलिस दलातील कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

यावेळी पोलिस अधीक्षकांनी सर्वांना आवाहन केले की, आपण दररोज किमान एक तास आपल्या शरीराच्या तंदुरुस्तीसाठी दिला पाहिजे. हा कार्यक्रम केवळ पोलिसांसाठीच नव्हे, तर सर्व नागरिकांसाठी फिटनेसचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला.

ही स्पर्धा तीन गटात घेण्यात आली. एका गटात प्रथम काळबांडे, द्वीतीय संतोष केकन, तृतीय निवृत्त सपोउपनि कैलास मिटकर यांनी क्रमांक पटकाविला तर दुसऱ्या गटात प्रथम ए एन पवार, द्वीतीय जे जी सावंत, तृतीय बी पी महागावे यांना यश मिळाले. तिसऱ्या गटात प्रथम पोउपनि संदीप मोरे, द्वीतीय एस पी सांगळे तर तृतीय पोलिस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे यांनी क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेचे आयोजन शहर वाहतुक शाखेचे पोलिस निरीक्षक शरद मरे, पोउपनि घुमनर, सपोउपनि शेषराव राठोड, जमादार गजानन राठोड, संतोष घुगे, नंदकिशोर महाजन, संभाजी मोरे, विलास सिनगारे, संजय चव्हाण, चंद्रशेखर देशमुख, कपील जाधव, शशीकांत भिसे, गजानन दांडेकर, मीरा सोनपावले, शिल्पा फटाले यांनी केले.

या स्पर्धेत सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी आणि ५० शी ओलांडणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनी चांगली कामगिरी बजावली. परंतु नुकतेच पोलिस दलात दाखल झालेले तरूण पोलिस कर्मचारी यांची कामगिरी मात्र सुमार दिसत होती. पोलिस विभागात तरूण पोलिस कर्मचाऱ्यांना इतर गोष्टींकडे लक्ष देण्याऐवजी त्यांच्या फिटनेसकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे अधोरेखीत झाले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून उद्योग विभागाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ ऑगस्ट**

उद्योग विभागाच्या अडी-अडचणी एकाच क्षेत्राखाली सोडविण्यासाठी आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीत जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी उद्योजक, व्यापारी संघटना यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या. उद्योगाविषयी उद्योजकांच्या तक्रारी एक खिडकीद्वारे सोडविण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक तथा नोडल अधिकारी यांच्याकडे आपले निवेदन सादर करावे, अशा सूचनाही दिल्या. राज्यातील युवक-युवतींना उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणे,त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी स्थानिक पातळीवर उपलब्ध करुन देवून रोजगार निर्मिती व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना ही महत्वकांक्षी योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उद्योजकात वाढ होण्यासाठी आज झालेल्या डीएलटीएफसी बैठकीमध्ये १५८ कर्ज प्रस्तावांना मंजुरीही देण्यात आली आहे.

या बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम, खादी ग्रामोद्योग अधिकारी, उद्योग संघटनेचे सचिव प्रवीण सोनी, नंदकिशोर तोष्णीवाल, अनिल नैनवाणी यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजक, विविध उद्योग संघटनेचे पदाधिकारी, व्यापारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# हिंगोलीत कृषी अधिकाऱ्यांना केळी पिकांबाबत प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ ऑगस्ट**

कृषी विभाग हिंगोली अंतर्गत सर्व मंडळ कृषी अधिकारी तसेच सहाय्यक कृषी अधिकारी यांचे केळी पिकावरील एकात्मिक कीड व रोग सर्वेक्षण (हॉर्ट सॅप) या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम आज तोंडापूर येथील कृषि विज्ञान केंद्रामध्ये यशस्वीपणे संपन्न झाला.

या कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. पी. पी. शेळके, पशुविज्ञान विभागाचे डॉ. कैलास गीते, वाशिम कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. डी. एन. इंगोले उपस्थित होते. प्रशिक्षणात कृषी विज्ञान केंद्राचे पीक संरक्षण विषयाचे तज्ञ प्रा. अजयकुमार सुगावे यांनी केळी पिकातील प्रमुख कीड व रोग तसेच त्यावरील एकात्मिक व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ तथा प्रमुख डॉ. पी. पी. शेळके यांनी आपल्या मार्गदर्शनात कृषी विज्ञान केंद्रात उपलब्ध असलेल्या विविध निविष्ठांची माहिती दिली. तसेच कृषी विभाग आणि कृषि विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांच्या विकासासाठी एकत्रित काम झाल्यास अधिक चांगला परिणाम साधता येईल, असे सांगितले. तसेच बैलपोळ्याच्या सणानिमित्त हिंगोलीतील सर्व शेतकरी व कृषी विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रशिक्षणाला हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी व वसमत मंडळातील कृषी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. कैलास गीते यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल जाधव व आकाश जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

**हिंगोली- अवघ्या दोन दिवसांवर श्री गणरायांचे आगमन होणार असून यानिमित्त हिंगोलीच्या बाजारपेठेत गणपतीसमोर आकर्षक रोषणाई, सजावट करण्यासाठी रंगीबेरंगी हार, लाईटींगच्या माळा, विविध प्रकारचे चक्रे, आसन, माळा आदी वस्तू विक्रीसाठी आल्या आहेत. गणेश मंडळासह सामान्य नागरिक विविध वस्तु खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी करीत आहेत. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त विविध कार्यक्रम

हिंगोली- राज्याचे क्रीडा व युवक सेवा संचालनालय व येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तसेच हिंगोली जिल्ह्यातील विविध क्रीडा संघटनांच्या वतीने हॉकीचे जादूगर मेजर ध्यानंचद यांचा जन्म दिवस दि. २९ ऑगस्ट हा दिवस तालुका क्रीडा संकुल येथे साजरा करावयाचा आहे. या दिवशी मेजर ध्यानंचद यांच्या प्रतिमेचे पूजन करुन हिंगोली जिल्ह्यातील विविध खेळातील राष्ट्रीय खेळाडू व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच या दिवशी सकाळी १०.३० वाजता तालुका क्रीडा संकुलावर खुल्या मॅरेथान व महिला कबडी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा परिषद मैदान हिंगोली येथे शालेय हॉकी क्रीडा स्पर्धा, तर जिल्हा क्रीडा संकुल येथे शालेय कराटे क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील राष्ट्रीय खेळाडूंनी आपल्या सत्कार सोहळ्यासाठी नामांकने दि. २८ ऑगस्टपर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी हिंगोली कार्यालयात सादर करावेत व या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी उपस्थित रहावेत, असे जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार यांनी केले आहे.

### ५८ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५८ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाने कार्यवाही करीत ५४६५० रूपयांचा दंड वसूल केला आहे.

# डीजे ऐवजी पारंपारीक वाद्यांचा वापर करा पोलिस अधीक्षक कोकाटे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ ऑगस्ट**

गणेश उत्सव व ईद-ए-मिलाप साजरा करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची प्रत्येक नागरिकांनी काळजी घेण्याची गरज आहे. पारंपरिक वाद्यदेखील डीजेपेक्षा कमी नाहीत. डीजेच्या तर आवाजाला मर्यादा आहेत. नियमाचे उल्लंघन झाले तर आपल्याला दंड लागू शकतो. त्यामुळे गणेश मंडळाच्या तरुणांनी डीजे वाजवण्याच्या फंदात न पडता पारंपरिक वाद्याचा वापर करावा, असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी शनीवारी (ता. २३) केले.औंढा नागनाथ येथे पोलिस ठाण्यामध्ये शांतता बैठकी झाली. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, गणेश उत्सव हा सार्वजनिक उत्सव आहे. गणेश मंडपामुळे रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची काळजी घेणे, गणेश मंडळाचे ठिकाणी दाखविण्यात येणारे देखावे हे आक्षेपार्ह अगर सामाजिक तेढ निर्माण होणार नाही अशा प्रकारचे ठेवावे; तसेच उत्सवानिमित्त वर्गणी गोळा करताना कोणावरही जबरदस्ती करू नका वर्गणी म्हणजे स्वेच्छेने दिलेली देणगी आहे. त्यामुळे मंडळाने जी मिळाली ती देणगी घेतली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीला एस पी कनकुटे, अनिल देव, सपोनी कैलास भगत, पोलीस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, मंडळ अधिकारी आशा गीते, महावितरण अभियंता किरण मोरे, साहेबराव देशमुख, राहुल दंतवार, मुख्य पुजारी तुळजादास भोपी, मौलाना विजय देशमुख, लल्ला देव पत्रकार बाळासाहेब साळवे, दत्तात्रय शेगुकर, विलास काचगुंडे, गजानन नाईक, रमेश वाहुळे, नागनाथ मुळे, सुरेश कीर्तने, राहुल वाघमारे यांच्यासह तालुक्यातील पोलीस पाटील व गणेश मंडळाचे अध्यक्ष व पदाधिकारी गावातील नागरिक उपस्थित होते. शांतता समितीच्या बैठकीस जमादार संदीप टाक, सुभाष जयताडे, वसीम पठाण, गजानन गिरी, माधव सूर्यवंशी, अमोल चव्हाण यांनी परिश्रम घेतले. प्रस्तावना पोलिस निरीक्षक जी एस राहिरे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक दत्ता कानगुले तर सपोनी कैलास भगत यांनी आभार मानले.

# पोलिस कर्मचाऱ्यांची एचआयव्ही संवेदीकरण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २४ ऑगस्ट**

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय हिंगोली यांच्या तर्फे जिल्ह्यातील पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची एचआयव्ही/एड्स संवेदीकरण कार्यशाळा पोलिस अधीक्षक कार्यालयात संपन्न झाली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी श्रीकृष्ण कोकाटे, पोलिस अधीक्षक हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दिपक मोरे, प्रभारी सहायक अधीक्षक (मु.) डी जी केंद्रे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री डी एस चौधरी हे होते. जिल्हा कार्यक्रम अधिकारी डी एस चौधरी यांनी एचआयव्ही/एड्स बद्दल सखोल माहिती देऊन २०१७ एचआयव्ही व एडस कायदा काय आहे, जिल्ह्यातील एचआयव्ही ची सद्यस्थिती काय आहे याविषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी संजय पवार, आशिष पाटील, श्रीमती टीना कुंदणानी, नितीन राठोड यांनी परिश्रम घेतले.

# हिंगोलीत देशभक्तीपासून ग्रामीण जीवन, गझल, सामाजिक जाणीवांचे कवी संमेलनातून दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २४ ऑगस्ट**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा हिंगोलीच्या वतीने कै. रं. रा. बियाणी नूतन साहित्य मंदिर वाचनालयाच्या नरहर कुरुंदकर सभागृहात कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापुरकर हे होते. यावेळी गोडाती काळे यांनी प्रास्ताविक करताना या संमेलनामागील उद्देश व भविष्यातील योजना या विषयावर भाष्य केले.

कार्यक्रमाची सुरुवात कवयित्री संगीता चौधरी यांच्या देशभक्तिपूर्ण कवितेने झाली. विरा तुम, विर हो हमारे. भारत मां के राज दुलारे या रचनेतून त्यांनी सीमारेषेवर लढणाऱ्या शूर सैनिकांना मानवंदना दिली.यानंतर जेष्ठ कवी कलानंद जाधव यांनी आपल्या अनोख्या शैलीत गावाच्या कडेला हराळीचं बेट... ही बालकविता सादर केली. या कवितेने क्षणभर रसीकांचे बालमन जागे झाले. त्यानंतर गोडाती काळे यांनी शेतकरी आणि बैलांच्या नात्यावरील खांदा ही हृदयस्पर्शी कविता सादर केली. काही खांदे आधारासाठी काही विश्वासासाठी काही भावना व्यक्त करण्यासाठी तर काही अंतिम प्रवासासाठी असतात. पण बैलांचे खांदे- झिजतात माणसाच्या जगण्यासाठी, स्वतःच्या जगण्याची कुर्बानी देऊन....! ही कविता ऐकून क्षणभर भावुक वातावरण झाले होते. सौ. सुमन दुबे यांनी धूप का सफर था सब जानते हो, चल रखे बादल के छालों पे मरहम। गौर से देखा जो घाव की गहराई, ये किसी अपने ने किये थे सितम या ओळींनी सजलेली गझल रसिकांसमोर ठेवली.या गझलेने सभागृहाला वेदणेची जाणिव करुन दिली.

गणेश येवले यांच्या आता कुठे ती आनंदाने सजते हल्ली. एक कोपरा धरून मुलगी बसते हल्ली. या सामाजिक आशयाने भरलेल्या कवितेने श्रोत्यांना विचार करायला लावले. कवयित्री सिंधुताई दहिफळे यांनी रानी बरसल्या सरी, काळ रान शहारलं दऱ्या खोऱ्यांनी अवखळ,नव वार उधानलं या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या ओळींनी वातावरण भारावले. यानंतर आश्विनी देशमुख यांनी काळोख असलेल्या आयुष्यात, पुन्हा तेजप्रभा देशील का? एकाकी सुन्या हृदयाची पुन्हा प्रीतभाग फुलवशील का? ही हृदयस्पर्शी कविता सादर केली. तर रघुवीर पतंगे यांनी तिनं आवाज वाढविला पण मी जरा गप्प झालो या विनोदी कवितेतून हशा पिकवला. पोळा सणाच्या संदर्भाने विजय गुंडेकर यांनी काय गुन्हा मीञतुमचा केला. या कवितेतून बैलांचे मनोगत मांडतांना भर जवानीत माझ्या तुझ्याच हाती होता कासरा, दर्या खोऱ्यात डोंगर दर्यात खळखळ आणि काळ्या रानात, पायालगत मी दौडत चाले शेतात, या कवितेने ग्रामीण जिवन परत एकदा जिवंत केले. तर डॉ. राधिका देशमुख यांनी टिप टिपणारा पावसाचे टपोरे होत जाणे. सरळ साध्या सरीचे गंधाळ मातीवर नाचणे.या कवितेतून कोसळणाऱ्या पावसाचे सुंदर निसर्गचित्र रंगवले.त्यानंतर राजकुमार मोरगे यांनी हुंकार वेदनेचा, येथेच जाणला मी, संवाद दिलांचा, येथेच ऐकला मी. या ओळींनी जीवनातील वेदना आणि संवादाची जाणीव रसिकांपर्यंत पोहोचवली. ज्येष्ठ साहित्यिक महारुद्र घेणेकर यांनी ओठ उघडले नाहीत,नजरेने बोललो मी, ती स्मितहास्यदेत म्हणाली- ओळखीचे वाटून राहिले, राहिले। हि कविता आपल्या विनोदी शैलीत सादर केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर यांनी जाहिरनामा ही कविता सादर केली. वेदनेला फुटलेली पालवी मी बघतो आहे, रोज या शहरातला प्रत्येक माणूस आणि प्रत्येक क्षण तणावग्रस्त, भयभीत आहे. या काव्यपंक्तींनी आधुनिक जीवनातील ताणतणावांचे जिवंत चित्र रेखाटले. कार्यक्रमाची सांगता ज्येष्ठ कवी रतन आडे यांच्या बाप या कवितेने झाली. शिस्त जंव्हा लावे,तव्हा तपे सुर्यावानी माया लावतांना,होतो विरघळून लोणी शिस्तीतुनं शिकवितो संसाराचा व्याप, तव्हा मलं व्यापामध्ये दिसतो महा बाप!

या सुरेल सादरीकरणाने सर्वांच्या डोळ्यांत पाणी आले. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये म.सा.प. हिंगोली शाखेचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक कादंबरीकार अशोक अर्धापुरकर यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात लोक आपली संस्कृती आणि जीवन जगण्याची कला विसरत चाललेले आहेत त्यामुळे अशा संमेलनांची आवश्यकता आहे असे प्रतिपादन केले

या कविसंमेलनात देशभक्ती, बालकविता, विनोदी काव्य, गझल, ग्रामीण जीवन, सामाजिक जाणिवा आणि हृदयस्पर्शी भावकविता अशा विविध काव्यप्रकारांची रंगतदार मेजवानी रसिकांना मिळाली. सभागृह टाळ्यांच्या गजराने दणाणून गेले. या संमेलनाचे सूत्रसंचालन रतन आडे यांनी आपल्या खुसखुशीत आणि सदाबहार शैलीत केले. यावेळी गणेश येवले यांनी गझलेच्या शास्त्रशुद्ध बाजू उकलत गझल हि फुलासारखी असुन एक एक पाकळी उमलल्यावर जसं फुल होते तशाच प्रकारे गझल आकार घेते असे प्रतिपादन केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राजकुमार मोरगे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथालयाचे ग्रंथपाल संतोष ससे, रामेश्वर गांजवे,संतोष सामाले,लक्ष्मण लाड यांनी परिश्रम घेतले

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

परंपरा

यथार्थ सिक्का

# पुन्हा वैभवाकडे वाहतोय... सरस्वतीचा प्रवाह!

**अम्बितमे नदीतमे देवितमे सरस्वति।**
**अप्रशस्ता इव स्मसि परशस्तिमम्ब नः कृधि॥**

८,००० वर्षांपूर्वी लिहिलेले ऋग्वेदातील हे स्तोत्र गंगा, यमुना आणि सरस्वतीसह अनेक नद्यांचे आदरयुक्त आवाहन आहे, जे त्यांना वैदिक संस्कृतीत पवित्र आणि जीवनशक्ती म्हणून ओळखते. यावरून हे सिद्ध होते की सरस्वतीचा उल्लेख वास्तविक आणि स्थिर वाहणाऱ्या नद्यांसोबत केला गेला होता. सरस्वती नदी हिमालयात उगम पावली आणि पश्चिमेला सिंधू नदी आणि पूर्वेला गंगा नदी दरम्यान वाहत पंजाब, हरियाणा, पश्चिम राजस्थान आणि गुजरातमधून जात होती. ती शेवटी अरबी समुद्रातील (सिंधू सागर) कच्छच्या रणात वाहत गेली. हवामान आणि भूगर्भातील बदलांमुळे सरस्वती नदी नाहीशी झाली. ऋग्वेदात सरस्वती नदीचे ७७ हून अधिक संदर्भ आहेत. वेद, पुराण आणि महाभारतातही सरस्वतीचा उल्लेख आहे. पण जेव्हा ऋग्वेदात सरस्वती नदी असल्याचे स्पष्टपणे लिहिले गेले तेव्हा इरफान हबीब आणि रोमिला थापर सारख्या मार्क्सवादी इतिहासकारांनी तिला मिथक असे संबोधले. त्यांनी शैक्षणिक भाषणे आणि शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये सरस्वतीचे अस्तित्व नाकारून आपल्या इतिहासातून आणि सामूहिक स्मृतीतून सरस्वती पुसून टाकण्याचा कट रचला.

तथापि, अलिकडील निष्कर्षांनी त्यांच्या दाव्यांमधील पोकळपणा उघड केला आहे. राजस्थानातील डीग जिल्ह्यातील बहज गावात, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) ने ४,५०० वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचे पुरावे शोधून काढले आहेत. १० जानेवारी २०२४ रोजी सुरू झालेल्या उत्खननात अनेक महत्त्वपूर्ण शोध उघड झाले, ज्यात २३ मीटर खोल पॅलिओ-वाहिनीचा समावेश आहे, जो पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मते, ऋग्वेदात उल्लेख केलेल्या सरस्वती नदीशी जोडलेला आहे.

इतिहास आणि त्याच्या पुनरुज्जीवनामागील तथ्ये जाणून घेण्यासाठी, आयोजक पथकाने हरियाणामधील कुरुक्षेत्र, यमुनानगर येथील सरस्वती नदीचे उगमस्थान असलेल्या आदि बद्रीला भेट दिली जिथे सरस्वती नदीचे पॅलेओ-वाहिन्या, स्थळे आणि पुरावे स्पष्टपणे दिसतात आणि तिचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

संस्कृतीचा मार्ग पुन्हा मिळवणे जगाधरीजवळील वाहत्या पाण्यापासून ते आदि बद्रीमधील शोधलेल्या कलाकृतींपर्यंत, सरस्वती नदी आता एक मिथक राहिलेली नाही, ती जिवंत आहे.

### वास्तविकता आणि वैज्ञानिक पुरावे

प्रथम, आम्ही कुरुक्षेत्रातील पीपली येथे पोहोचलो, जिथे आम्ही हरियाणा सरस्वती वारसा विकास मंडळाचे उपाध्यक्ष धुमन सिंग किरमाच यांना भेटलो. सरस्वती नदीच्या वास्तवाबद्दल ऑर्गनायझरला माहिती देताना ते म्हणाले, सरस्वती ही एक मिथक आहे असे मानणारे १०० टक्के चुकीचे आहेत आणि ते बनावट कथा चालवत आहेत. तुम्ही पाहत असलेला सरस्वतीचा प्रदेश आणि प्रवाह आम्ही सुफल केला आहे, विशेषतः २०१५ मध्ये हरयाणामध्ये सरस्वती बोर्डाची स्थापना झाल्यापासून, हे बोर्ड केवळ सरस्वती नदीच्या पुनरुज्जीवनासाठी आणि तिचा प्रवाह पुनर्संचयित करण्यासाठी स्थापन करण्यात आले होते.

### 'फक्त नदी नाही'

सर्वसाधारणपणे उपस्थित होणारा प्रश्न असा आहे की, सरस्वती नदीवर आपण संशोधन का करत आहोत, जी आता नामशेष झाली आहे? आजही वाहणाऱ्या नद्यांच्या स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करणे अधिक व्यावहारिक ठरणार नाही का?

सरस्वतीचा अभ्यास केवळ प्रासंगिक नसून आवश्यक का आहे याची तीन प्रमुख कारणे आहेत:

### भारतीय संस्कृतीची सांस्कृतिक ओळख

सरस्वती नदी ही केवळ एक भौगोलिक अस्तित्व नाही, ती भारताच्या संस्कृतीच्या ओळखीचे प्रतीक आहे. सरस्वतीचा पुन्हा शोध घेणे म्हणजे स्वतःचा पुन्हा शोध घेणे. ज्ञान, ज्ञान आणि स्थलांतराचे प्राचीन प्रवाह ज्यांनी जागतिक संस्कृतींना आकार दिला ते भारतातूनच उद्भवले हे सत्य स्थापित करण्यास मदत करते.

### खोलवर जलचर ओळख

ही नदी सहा कोटी वर्षांहून अधिक काळ अस्तित्वात होती आणि १४०२ पर्यंत सतत वाहत होती. सरस्वतीमधून वाहणारे प्रचंड पाणी पृथ्वीच्या पृष्ठभागाखाली शोषले गेले आहे का हे तपासण्यासारखे आहे.

### खनिज संपत्ती आणि आर्थिक क्षमता

पर्वतांमधून उगम पावणाऱ्या आणि समुद्रात वाहणाऱ्या नद्या बहुतेकदा त्यांच्या उगमस्थानातील प्रदेशांमधून समृद्ध खनिज साठे घेऊन जातात. सरस्वतीच्या बाबतीत, अशा साठ्यांचे संभाव्य पुरावे आहेत. शिवालिक पर्वतरांगांमध्ये सोन्याचे ठिपके आढळले आहेत, जे सरस्वतीच्या प्राचीन प्रवाहाचा भाग असल्याचे मानले जाते. आज, यमुनानगर जिल्ह्यातील बिलासपूरपासून ते व्यासपूरपर्यंत, जिथे ऋषी व्यासांनी महाभारत रचला होता, सरस्वती नदीचे पाणी कुरुक्षेत्र, यमुनानगर, कैथल आणि पंजाबच्या काही भागातून वाहते जिथे सरस्वती स्थानिक जलप्रणालींमध्ये विलीन होते. तिथून, ती जिंद, फतेहाबाद आणि सिरसा पर्यंत ४०० किमी अंतरावर पसरते, जिथे आम्ही गेल्या तीन वर्षांपासून यशस्वीरित्या पाण्याचा प्रवाह पुनर्संचयित केला आहे.

त्यानंतर त्यांनी आम्हाला नदीकाठी एक नदीकाठ दाखवला आणि म्हणाले, येथे सरस्वती नदीवर नदीकाठ बांधला जात आहे. तो सरस्वतीच्या पॅलिओ-वाहिनीवरच स्थित आहे. आमचा पहिला सामंजस्य करार इस्रोसोबत झाला होता आणि इस्रोनेच आम्हाला बंदरपुंच हिमनदीपासून कच्छच्या रणापर्यंतच्या सरस्वती नदीच्या संपूर्ण पॅलिओ-वाहिनीचे मॅपिंग प्रदान केले होते. इस्रोने आम्हाला हा संपूर्ण ट्रॅक दिला आहे आणि सर्व प्रमुख संशोधन संस्थांनी यावर आमच्यासोबत काम केले आहे. भारतीय भूगर्भ सर्वेक्षणने संशोधन केले, ओएनजीचसीने अभ्यास केला आणि आता (केंद्रीय भूजल मंडळ) देखील आमच्यासोबत काम करत आहे. सर्व प्रमुख राष्ट्रीय संस्थांनी या ट्रॅकला सरस्वती नदीचा वास्तविक प्रवाह असल्याचे प्रमाणित केले आहे, सरस्वती एकेकाळी येथे वाहत होती आणि आजही वाहते आहे.

ते पुढे म्हणाले, महाभारत काळात, जो सुमारे ५,००० वर्षांपूर्वी घडला असे मानले जाते, सरस्वतीच्या पाण्याचा प्रवाह खूपच कमी झाला होता, जवळजवळ नामशेष होण्याच्या मार्गावर होता. ही वस्तुस्थिती ऋग्वेदासह इतर धर्मग्रंथांमध्ये नमूद केली आहे. वामन पुराणातही, भगवान कृष्णाचे भाऊ बलरामजी यांचा उल्लेख आहे, ज्यांनी महाभारत युद्धात भाग घेतला नाही तर त्याऐवजी सरस्वती नदीकाठी तीर्थयात्रा केली.

### टेक्टोनिक शिफ्ट आणि पुनरुज्जीवन

सरस्वती नदीच्या नामशेष होण्यामागील कारण स्पष्ट करताना ते म्हणाले, सरस्वती नदीच्या लुप्त होण्यामागील मुख्य कारण टेक्टोनिक शिफ्ट होते. सरस्वतीचा उगम बंदरपंच हिमनदीतून होतो, एक टन नदी अजूनही तिथून वाहते. टन नदी डेहराडूनच्या डाकपठारजवळ यमुनेत विलीन होते आणि ती यमुनेचे मोठ्या प्रमाणात पाणी वाहून नेते. आम्हाला वाटते की टन ही प्रत्यक्षात सरस्वती आहे आणि आम्ही ते स्थापित करण्यासाठी काम करत आहोत. टन नदीचे संपूर्ण पाणी सरस्वतीच्या त्याच पॅलिओ-वाहिनीने वाहते. जीएसआय, वाडिया इन्स्टिट्यूट, आयआयटी रुरकी आणि आमच्यासोबत संशोधनात सहभागी असलेल्या इतर संस्थांनी त्यांच्या अभ्यासातून असे आढळून आले आहे की हा संपूर्ण प्रदेश सरस्वतीच्या मार्गाशी जुळतो.

बाओहली गावात, सरस्वती नदी आणि सरस्वती सरोवर (जलाशय) यांच्यात थेट संबंध स्थापित करण्यात आला आहे. सकाळी किती पाणी येते आणि संध्याकाळी किती पाणी रिचार्ज होते याचा मागोवा घेण्यासाठी त्या ठिकाणी एक वॉटर मापक बसवण्यात आला आहे, ज्यामध्ये सर्व डेटा काळजीपूर्वक वापरला जातो. नोंद केली आहे.

या भागात सरस्वती नदीच्या काठावर आढळणाऱ्या आणि वैदिक काळापासून अस्तित्वात असलेल्या लहान मासे आणि कोळंबीसारख्या अद्वितीय जलचरांच्या प्रजातींचे अस्तित्व देखील दिसून येते. ही सतत उपस्थिती नदीच्या प्राचीन वारशाची साक्ष आहे आणि नदीच्या व्यापक पुनर्संचयनाचा भाग म्हणून या प्रजातींचे पुनरुज्जीवन आणि संरक्षण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

### सरस्वतीचा मार्ग शोधणे

मनोरंजक गोष्ट म्हणजे, रियाणामध्ये उत्खनन केलेल्या सर्व पुरातत्वीय स्थळे सरस्वती नदीच्या पॅलेओ-वाहिनीवर आहेत, मग ती राखीगढी असो, कुणाल असो किंवा भिराणा असो. कुणाल हे किमान १०,००० वर्षे जुन्या सस्कृतीचा भाग मानले जाते, जी सरस्वतीच्या काठावर भरभराटीला आली आणि ते पुरातत्व विभागाच्या संशोधनावर आधारित आहे. सरस्वतीच्या कालव्याचे आणि प्रवाहाचे स्पष्टीकरण देताना ते म्हणाले, राजस्थानमध्ये, कालीबंगन आणि पिलीबंगा सारखी ठिकाणे देखील सरस्वती पॅलिओ-वाहिनीवर आहेत. या प्रदेशातील पाणी राजस्थानकडे वाहत राहते. राजस्थान सरकारने अलीकडेच एक समिती स्थापन केली, ज्याने सिरसा येथील ओट्टू बॅरेजवर लक्ष केंद्रित केले, जिथे आपल्याकडे १,५०० एकरमध्ये पसरलेला एक विशाल तलाव आहे.

### एएसआयने पहिले उत्खनन केलेले स्थळ

तेथून, आम्ही एएसआयने उत्खनन केलेल्या पहिल्याच स्थळाकडे निघालो - पिपलीमधील बाहोली गाव. धुमन सिंग यांनी आम्हाला सांगितले की बाहोली आणि भगवानपुरा ही दोन्ही पुरातत्वीय स्थळे आहेत जी १९९० च्या दशकात उत्खनन करण्यात आली होती. त्यांनी स्पष्ट केले, ''जेव्हा एएसआयने येथे उत्खनन सुरू केले तेव्हा आम्हाला आढळले की ती स्थानिक पंचायतीची सोडून दिलेली जमीन होती. ती सरस्वती नदीच्या काठावर आहे. उत्खनन दरम्यान, आम्हाला येथे सापडलेली वाळू दिसली, जर तुम्ही त्याची तुलना राजस्थान आणि गुजरातमधील सरस्वती मार्गावर सापडलेल्या वाळूशी केली तर ती अगदी सारखीच आहे. हा संपूर्ण प्रदेश प्राचीन नदीच्या पॅलिओ-वाहिनीवर आहे. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, येथील वाळू इतकी सच्छिद्र आहे की जर आपण सकाळी तलाव भरला तर संध्याकाळपर्यंत तो अर्धा रिकामा होईल. या जमिनीची पुनर्भरण क्षमता इतकी शक्तिशाली आहे. पॅलिओ-चॅनेल थेट जमिनीखाली जोडलेली आहे आणि मातीमध्ये नैसर्गिक पोकळी आहेत ज्यामुळे पाणी लवकर खाली झिरपते. यामुळे परिसरातील पाण्याच्या पातळीत मोठी सुधारणा झाली आहे. स्थानिक शेतकरी अत्यंत आनंदी आहेत. सरस्वती पुनरुज्जीवन आणि सरस्वती सरोवर सारख्या जलाशयांच्या बांधकामानंतर भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. पूर्वी पावसाचे पाणी वाहून जात असे. आता, या जलाशयांमुळे आणि सरस्वतीचे पाणी त्यात वळवल्यामुळे, पावसाचे पाणी साठवले जात आहे आणि जलसाठ्यांचे प्रभावीपणे पुनर्भरण केले जात आहे. यामुळे संपूर्ण प्रदेशाला मोठे फायदे झाले आहेत.

**(ऑर्गनायझरवरून साभार)**

वर्तमान

ललित फुलारा

# निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक... मतचोरीचे राजकारण

मतदार यादीत दुरुस्ती होऊ नये असे विरोधकांना वाटते का? हा तोच विरोधी पक्ष आहे ज्यांनी आधीच मतदार यादीत दुरुस्तीची मागणी केली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणतात की गेल्या दोन दशकांपासून म्हणजेच २० वर्षांपासून विविध राजकीय पक्ष मतदार यादीत दुरुस्तीची मागणी करत आहेत. ही मागणी पूर्ण करण्यासाठी बिहारमध्ये विशेष गहन सुधारणेची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि विरोधकांनी केलेले मतचोरीचे आरोप फेटाळून लावले आहेत. बिहार मतदार यादीतील अनियमिततेचे सर्व आरोप निराधार असल्याचे आयोगाचे म्हणणे आहे. राहुल गांधी यांनी सात दिवसांत प्रतिज्ञापत्र द्यावे किंवा देशाची माफी मागावी. त्यांच्याकडे तिसरा पर्याय नाही. बिहारमधील मतदार यादीच्या विशेष गहन सुधारणेचा उद्देश मतदार यादीतील त्रुटी दूर करणे आहे, असे आयोगाने स्पष्ट केले. अशा परिस्थितीत, प्रश्न उद्भवतो की राहुल गांधी आणि विरोधी पक्ष मतचोरीचे राजकारण का करत आहेत? खरंतर, भारतीय जनता पक्षाला (भाजपा) कोंडीत पकडण्यासाठी इंडिया अलायन्सकडे दुसरा कोणताही मुद्दा नाही. अशा परिस्थितीत, राहुल गांधी आणि विरोधी पक्ष निवडणुकीत भाजपचा पराभव व्हावा म्हणून मतचोरीचा मुद्दा बनवून असे विधान करू इच्छितात. मतचोरीच्या बहाण्याने राहुल गांधी पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य करू इच्छितात. पण विरोधकांचा हा मुद्दा त्यांच्यासाठी अडचणीचा ठरत आहे, कारण आता प्रश्न उपस्थित होत आहेत की राहुल गांधी आणि इंडिया अलायन्स देशाच्या संवैधानिक संस्थांना कमकुवत करण्याचा प्रयत्न का करत आहेत? राहुल गांधी आणि विरोधी पक्ष वारंवार मतचोरीवर खोटे बोलत आहेत पण कोणतेही पुरावे देत नाहीत. मतदार यादीत दुरुस्तीची प्रक्रिया १० पेक्षा जास्त वेळा करण्यात आली आहे. मतदार यादीत दुरुस्ती होऊ नये असे विरोधकांना वाटते का? हा तोच विरोधक आहे ज्यांनी आधीच मतदार यादीत दुरुस्तीची मागणी केली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी जे म्हटले आहे ते विरोधक नाकारू शकतात का?

निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेनंतर विरोधकांचे संपूर्ण कथन उघड झाले. यानंतर, विरोधक संसदेत निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव आणण्याची तयारी करत आहेत. हे स्पष्ट आहे की मोदी सरकारला कोंडीत पकडण्यासोबतच, निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याबाबत तीळाच्या ढिगाऱ्यातून डोंगर बनवण्याची विरोधी पक्ष पूर्णपणे तयारी करत आहेत. प्रत्यक्षात, त्यांच्या परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्पष्टपणे सांगितले होते की काही राजकीय पक्ष निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून मतदारांना लक्ष्य करून राजकारण करत आहेत. हे विधान विरोधकांच्या आरोपांना उत्तर म्हणून होते, ज्यामध्ये म्हटले होते की बिहारमध्ये मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्तीद्वारे मत चोरीचा कट रचला जात आहे. निवडणूक आयुक्तांचे हे विधान विरोधक सहन करू शकले नाहीत आणि त्यांच्याविरुद्ध महाभियोगाचा कट रचण्यात आला. प्रश्न असा आहे की कोणत्याही पुराव्याशिवाय मतचोरीचे गंभीर आरोप करून, विरोधी पक्ष आणि राहुल गांधी संविधान आणि लोकशाहीचा अपमान करत नाहीत का? काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल (राजद) सारख्या अखिल भारतीय आघाडीच्या पक्षांनी मतचोरीला मुख्य मुद्दा बनवले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त म्हणाले की, निवडणूक निकाल निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केल्यानंतर, कोणत्याही राजकीय पक्षाला ४५ दिवसांच्या आत सर्वोच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्याचा अधिकार आहे. जर या काळात कोणतीही अनियमितता आढळली नाही, तर नंतर निराधार आरोप करणे योग्य नाही. हे विधान विरोधी पक्षाच्या आरोपांना उत्तर म्हणून होते, ज्यांनी मतदार यादीत फेरफार आणि मतचोरीचा आरोप केला होता. जेव्हा हा नियम आहे, तेव्हा विरोधी पक्षांनी त्याचे पालन का केले नाही? राहुल गांधी आणि विरोधी पक्ष एसआयआरवर विश्वास का ठेवत नाहीत? याद्वारेच मतदार यादीतील विसंगती दूर केल्या जातील. बिहारमधील मतदार यादीतील विसंगती दूर व्हाव्यात असे विरोधी पक्ष का इच्छित नाही?

प्रत्यक्षात देशातील विद्यमान विरोधी पक्षांकडे सत्तापेक्षाविरोधात कोणतेही मुद्दे उरलेले नाहीत. त्यामुळे त्यांना फक्त हवेत गोष्टी करून सरकारसमोर प्रशासकीय कारभाराच्या समस्या निर्माण करायच्या आहेत. मात्र, असे करताना ते विसरताहेत की, देशाची प्रशासकीय व्यवस्था विस्कळीत करणे भविष्याच्या दृष्टीने महागात पडू शकते.

प्रश्न असा आहे की कोणत्याही पुराव्याशिवाय मतचोरीचे गंभीर आरोप करून, विरोधी पक्ष आणि राहुल गांधी संविधान आणि लोकशाहीचा अपमान करत नाहीत का? काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल (राजद) सारख्या अखिल भारतीय आघाडीच्या पक्षांनी मतचोरीला मुख्य मुद्दा बनवले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त म्हणाले की, निवडणूक निकाल निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केल्यानंतर, कोणत्याही राजकीय पक्षाला ४५ दिवसांच्या आत सर्वोच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्याचा अधिकार आहे.

*(पाञ्चजन्यवरून साभार)*

संस्कृती

# तस्मै श्री वृषभाय नमः!

मानव हा सर्वदृष्टीने समाजशील प्राणी मानला जातो. पण, त्याची ही समाजशीलता केवळ मानवी समाजापुरतीच मर्यादित नसून, आपल्या परिसरातील पशुपक्ष्यांशीदेखील निगडित आहे. यासाठीच तर वेदांनी आपल्या समवेत राहणाऱ्या प्राणीमात्रांशी मैत्रीचे नाते जोडण्याचा संदेश दिला आहे. एका मंत्रात म्हटले आहे-

**मित्रस्य चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षन्ताम्!**

सर्वच जीवांशी आम्ही मित्रत्वाच्या नात्याने प्रेमपूर्ण दृष्टीने पाहत आहोत. कधीही कोणाशी वैरभावना बाळगून हिंसक वृत्ती ठेवता कामा नये. कारण, आम्हा सर्वांचे जीवनच एक दुसऱ्यावर अवलंबून आहे.

मानवी जीवनात उपयुक्त ठरणारे प्राणी हे तर आपले सोबतीच! यामध्ये गायी, बैल, म्हशी, घोडे, कुत्रे व इतर प्राणी आपणांकरिता फायद्याचे ठरतात. अशा मुक्या प्राण्यांविषयी दया व सद्भावना ठेवत कृतज्ञता बाळगणे, हे माणसाचे कर्तव्य आहे. गाईला तर 'गावो विश्वस्य मातर' असे संबोधून तिला जगाच्या मातेचा गौरव प्रदान केला आहे. गाई सोबतच बैलाचेदेखील तितकेच महत्त्व आहे. जिथे गाय आम्हांस अमृतमय दुग्ध प्रदान करून शारीरिकदृष्ट्या बलवान व बौद्धिकदृष्ट्या तेजस्वी बनवते, तेथे बैल हेदेखील आपल्या कष्टपूर्ण जीवनाने या पावन भूमीतून सोने पिकवतात. रात्रंदिवस कष्ट करीत आपल्या पोषणकर्त्या बळीराजाला मोलाची साथ देतात.

कृषीला सुजलाम्-सुफलाम् करण्यात अत्यंत जवळचा घटक जर कोणता असेल, तर तो म्हणजे बैल! शेतीचे सर्वदृष्टीने संवर्धन करण्याकरिता आपले सर्वस्व समर्पित करणाऱ्या या वृषभ देवाविषयी कृतज्ञता बाळगणे, हे आम्हां भूमिपुत्रांचे कर्तव्य नव्हे काय? यासाठीच तर बैलपोळा साजरा करण्याची परंपरा आपल्या देशात रूढ झाली आहे.

शेती हा भारतीयांचा प्रमुख व्यवसाय. म्हणूनच तर आपला देश कृषिप्रधान देश समजला जातो. पण, या कृषीला सुजलाम्-सुफलाम् करण्यात अत्यंत जवळचा घटक जर कोणता असेल, तर तो म्हणजे बैल! शेतीचे सर्वदृष्टीने संवर्धन करण्याकरिता आपले सर्वस्व समर्पित करणाऱ्या या वृषभ देवाविषयी कृतज्ञता बाळगणे, हे आम्हां भूमिपुत्रांचे कर्तव्य नव्हे काय? यासाठीच तर श्रावण महिन्याच्या अमावस्येला बैलपोळा साजरा करण्याची परंपरा आपल्या देशात रूढ झाली आहे.

बैलासाठी संस्कृत वाङ्मयात वृषभ, पोळ, खोंड, वाह, बलिवर्द, उक्षाण इत्यादी नावांचा उल्लेख आढळतो. जो नेहमी शेतकऱ्यांवर सुखाचा वर्षाव करतो, म्हणून तो वृषभ! बळाने परिपूर्ण आहे, म्हणून बलिवर्द किंवा बैल! ऋग्वेदात एके ठिकाणी नांगराच्या साह्याने बैलांच्या मेहनतीतून उत्कृष्ट बियाणे पेरून अन्नाचे भरपूर उत्पादन घ्यावे, असा उल्लेख आला आहे, तर ऋषी पाराशर एके ठिकाणी नांगराचे विविध प्रकार वर्णन करताना नांगर हा आठ बैलांचा, सहा बैलांचा, चार बैलांचा किंवा दोन बैलांचा असतो, असे म्हणतात. याच बैलाच्या साह्याने शेतकरी आपल्या शेतातील मशागतीची सर्व कामे करतो. यात कुळवणी, पेरणी, कोळपणी तसेच इतर सर्व कामांचा समावेश आहे.

अगदी प्रारंभापासून शेवटपर्यंत खऱ्या अर्थाने हा बैल शेतकऱ्यांचा मित्र आहे. भूमीत बीज पेरणीच्या अगोदरपासून त्याच्या कष्टाला प्रारंभ होतो आणि शेवटी धान्याची रास घरामध्ये आणून ठेवेपर्यंत तो आपला खरा मदतनीस असतो. इतकेच काय तर बैलगाडीतून धान्य व इतर ओझे वाहून घेऊन जाण्याबरोबरच आपल्या बळीराजांच्या कुटुंबालादेखील अगदी ऐशोआरामात बसवून या गावाहून त्या गावापर्यंत घेऊन जातो. जुन्या काळात तर मोठ्या प्रमाणात बैलांच्या साहाय्यानेच वाहतुकीची सर्व कामे केली जात असत. एका दृष्टीने बैल हा अत्यंत जवळचा साहाय्यक मित्रच मानले जात असे. आपली सर्व कामेदेखील तो अगदी प्रसन्न वदनाने करतो. माणसाला कदाचित कंटाळा येऊ शकतो. परंतु, बैल नावाचा सहनशील मित्र मात्र कधीही थांबत नाही की, निराश होत नाही. बैलाचे स्वतःसाठी असे काहीच नाही. जे काही आहे, ते मानवासाठीच! दुर्दैवाने आजच्या यांत्रिक युगातील मानव हा या अतिशय उपकारक, अशा जीवाचे महत्त्व विसरून अधिक धान्योत्पादन मिळवण्याच्या हव्यासापोटी बैलांना दूर ठेवत आहे. यंत्राच्या साहाय्याने शेतीची उत्पादकता नाहीशी करीत आहे. कारण, बैलांच्या पदस्पर्शाने भूमीला मोठ्या प्रमाणात शेण व मूत्र मिळते. त्यामुळे जमीन सुपीक बनते. तसेच, बैलांच्या पायातील खुरामुळे जमीन भुसभुशीत होते.

त्याच्या शिंगातही कॅल्शियम व नत्र असते. बैलाच्या मृत्यूनंतर त्यांचे अवयवदेखील कामास येतात. त्यांच्या शिंगात पाणी, माती व शेण भरून ते जमिनीत पुरल्यास फार मोठे लाभ होतात.तसेच, बैलांच्या हाडांमध्ये कॅल्शियम, चुना असतो. त्यात फॉस्फरस, पोटॅशियम व नत्र असते. हाडांचा चुरा करून तो शेतात टाकला असता त्याचा चांगला फायदा होतो. त्याचबरोबर शेणाचा उपयोग खत म्हणून तर होतोच; पण त्याबरोबरच मातीदेखील पांढरी पडते. नत्रामुळे शेतीची उत्पादनक्षमतादेखील वाढते.

अशा या निरुपद्रवी व उपकारक जीवाला सध्याची व्यवस्था कत्तलखान्यात पाठवून त्याची हत्या करीत आहे. शुद्ध शाकाहारी असलेल्या या पवित्र प्राण्याचे मांस भक्षण करण्यासाठी आजचा माणूस फारच चटावलाय. याचे दुष्परिणाम काही दूर नाहीत. हे माणसाला भोगावेच लागतील.

या थोर कृषी मित्राविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा पोळा हा सण. यानिमित्त या वृषभदेवाच्या सद्गुणांचे पूजन करून त्यांच्या रक्षणाचा संकल्प करू या!

**करी जो भूमीचे रक्षण**
**देई कृषकां नित सुधन ,**
**परोपकारी त्या वृषभदेवास**
**आमचे कृतज्ञतापूर्वक वंदन!**

# नुकसानग्रस्तांच्या सर्व समस्या प्राधान्याने सोडवू : पालकमंत्री अतुल सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. २४ ऑगस्ट -**

मागील आठवड्यात नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालुक्यात मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे हसनाळ, रावणगाव, भिंगोली, भासवाडी, मुक्रमाबाद या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण होवून मोठया प्रमाणात हानी झाली. अनेक घरांची पडझड झाली तर हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली. या सर्व नुकसानीचे पंचनामे सुरू असून नुकसानग्रस्तांच्या सर्व समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील, अशी ग्वाही राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली.

पालकमंत्री यांनी आज मुखेड तालुक्यातील हसनाळ, रावणगाव, भासवाडी, मुक्रमाबाद या पूरग्रस्त गावांना भेट देवून पूराच्या पाण्यामुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली व नागरिकांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. त्यांच्यासोबत खासदार अशोक चव्हाण, आमदार डॉ. तुषार राठोड, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, मुखेडचे तहसिलदार राजेश जाधव आदींसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पूरग्रस्तांच्या सर्व समस्या तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडण्यात येवून त्या सर्व समस्या सोडविण्यात येतील. नुकसानग्रस्तांना जास्तीत जास्त मदत देण्यात येईल अशी माहिती पालकमंत्री श्री. सावे यांनी दिली. यावेळी हसनाळ येथे पालकमंत्री यांनी वैयक्तिकरित्या मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत धनादेशाद्वारे देण्यात आली.

तसेच नुकसान झालेल्या पुनर्वसित गावातील नागरिकांचे लवकरच पुनर्वसन करण्यात येवून या नागरिकांना पक्की घरे देण्याचा येतील. शासन नुकसानग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाच्यावतीने मदत करण्यात येईल, असे पालकमंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले.

पूरग्रस्त भागातील नागरिकांना वाचविण्यासाठी व त्यांना मदत करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कौतुकास्पद काम केले असून मी त्यांच्या सतत संपर्कात राहून माहिती घेत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच नुकसानग्रस्त भागात पाणी शिरुन जी हानी झाली यास जबाबदार असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

**पालकमंत्री सावे यांच्याकडून वैयक्तिकरित्या मृतांच्या वारसदारांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत**

संवेदनशील पालकमंत्री अतुल सावे यांनी वैयक्तिकरित्या मयत व्यक्तीच्या वारसांना प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या धनादेशाचे वाटप पालकमंत्री यांच्या हस्ते हसनाळ येथे करण्यात आले. तसेच ज्या नागरिकांच्या घरात पाणी शिरले होते अशा नागरिकांना १० हजार रुपयांच्या धनादेशाचे वाटप यावेळी करण्यात आले.

मागील तीन दिवसांपूर्वी पालकमंत्री अतुल सावे यांनी जिल्ह्यातील पूर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन पूरग्रस्तांसाठी मदत साहित्य उपलब्ध करून दिले होते. हे साहित्य देगलूरचे उपविभागीय अधिकारी व मुखेडचे तहसीलदार यांच्यामार्फत पूरग्रस्तगावांमध्ये वितरण करण्यात आले. या साहित्यात प्रामुख्याने दैनंदिन वापरातील कपडे साडी, टीशर्ट, ट्रॅकपँट, टॉवेल, आणि जीवनावश्यक औषधे पॅरासीटामॉल टॅबलेट स्ट्रिप, ओआरएस इ. साहित्याचा यामध्ये समावेश होता.

**पालकमंत्री अतुल सावे यांनी घेतला जिल्ह्यातील नुकसानीचा आढावा**

आज सकाळी पालकमंत्री अतुल सावे यांनी शासकीय विश्रामगृहात जिल्ह्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा सविस्तर घेतला. यावेळी खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे, सर्व विभागाचे विभाग प्रमुख आदीची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचा माहिती दिली.

## अवैध रेतीमाफियांवर रामतीर्थ पोलिसांचे सर्जिकल स्ट्राईक; टीपरसह २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २४ ऑगस्ट -**

अवैधरित्या रेतीची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरुद्ध रामतीर्थ पोलिसांनी दि. २३ ऑगस्ट रोजी मोठी कारवाई केली असून. टीपरसह तब्बल २५ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कार्यवाही जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे व त्यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे केरूर गावाजवळून एक हायवा टिप्पर चक-२६ उक ९६१२ अडवून तपासणी केली असता त्यात सुमारे ७ ब्रास लाल रेती अवैधरित्या भरून नेण्यात येत असल्याचे आढळले. ही वाहतूक परवाना व कोणतीही अधिकृत कागदपत्रे नसताना चोरून नेल्या जात होती.सदर टिप्पर आणि त्यातील रेतीचा एकूण मुद्देमाल २५ लाख ३५ हजार रुपये किमती चा असून तो रामतीर्थ पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

या प्रकरणात साईनाथ बाबाराव मोरे (वय ३०, रा. टाकळी, ता. नायगाव) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध भा.दं. वि. कलम ३७९(२) व ज. म.अधिनियम४८(७)नुसार रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कार्यवाही सतिश गुरव अपर पोलीस अधीक्षक नांदेड, सौ.अर्चना पाटील अपर पोलीस अधीक्षक भोकर, पानेगांवकर उपविभागीय पोलीस अधिकारी बिलोली, यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. सदर प्रकरणी स.पो.नि. विक्रम हराळे यांच्या सोबत पोहेकॉ काळे, पो.शिपाई यरपलवाड, पो. शिपाई इजळकुंठे यांनी कार्यवाहीत सहभाग घेतला जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी रामतीर्थ पोलिस पथकातील कर्मचार्यांच्या कार्य तत्परतेची प्रशंसा करीत सर्व टीमचे अभिनंदन केले आहे

## सराईत आरोपीच्या वाहनावर गोळीबार करुन पकडण्याचा प्रयत्न

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. २४ ऑगस्ट -**

शहरातील कौठा भागात तीन सराईत आरोपी आल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने त्यांचा पाठलाग केला. त्यावेळी ते पळून जात असताना गोळीबार करण्यात आला. मात्र पोलिसांना चकमा देवून हे आरोपी फरार झाले.

नांदेडच्या स्थानिक गुन्हा शाखेला मिळालेल्या माहितीनुसार काल रात्री तीन सराईत आरोपी हे नांदेडमध्ये आल्याची माहिती प्राप्त झाली. त्यापैकी एक जण गुन्ह्यामध्ये पोलिसांना वॉन्टेड होता. त्यांच्याकडे गावठी बंदुका असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सर्व तयारीनिशी स्थानिक गुन्हा शाखेचे पथक त्यांचा मागोवा घेत कौठा भागात गेले. तेथे विना नंबरच्या काळ्या टाटा हरियर गाडीमध्ये ते दिसून आले. पोलिसांची गाडी समोरुन येत असल्याचा सुगावा त्यांना लागला व पोलीस आपल्याला पकडण्यासाठी येत आहेत ते पाहून त्यांनी पोलिसांच्या टिमवर प्राणघातक हल्ला केला. पोलिसांच्या अंगावर गाडी घालून पुढे जाण्याच्या उद्देशाने ते समोर आल्याने पोलीसही आक्रमक झाले. पोलीस अंमलदार बोधगिरे यांना सदरच्या गाडीची धडक झाली त्यात ते जखमी झाले. तसेच याच रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या इतर दुचाकी वाहनांना धडक देवून या आरोपींनी पाडले. तरीही पोलिसांनी पाठलाग सुरु ठेवला. सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे यांनी त्यांच्या पिस्टलमधून गाडीच्या टायरवर फायर केले. त्यामध्ये या गाडीचा टायर फुटला. तर एक आरोपी किरकोळ जखमी झाला होता. तरीही त्यांनी तशी गाडी रविनगर चौकाकडे घेवून ते पळाले. ग्रामीण पोलीस ठाण्याला याबाबत माहिती देवून नाकाबंदी लावण्यात आली. त्यांचा पाठलागही केला. मात्र असर्जन गावाच्या पुढे पादंन रस्त्यावर सदरची गाडी सोडून अंधाराचा फायदा घेवून ते आरोपी पळाले. आरोपीतांची गाडी पोलिसांनी जप्त केली असून, सहायक पोलीस निरीक्षक घोगरे यांच्या तक्रारीवरुन ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकीत आरक्षण संदर्भात नवीन वळण

**तभा वृतसेवा**
**किनवट , दि. २४ ऑगस्ट -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम लवकरच पार पडणार आहे. ही सोडत नव्या नियमावलीनुसार होणार असून, ही जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतील पहिलीच आरक्षण सोडत ठरणार आहे. यापूर्वीच्या निवडणुकांमधील आरक्षण पद्धती किंवा गट-गणांचा संदर्भ यापुढे ग्राह्य धरण्यात येणार नाही. याआधी १९९७, २००२, २००७, २०१२ व २०१७ या निवडणुकांसाठी १९९६ च्या नियमावलीचा वापर होत होता. मात्र ग्रामविकास विभागाने नव्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पद्धत व चक्रानुक्रम) नियम २०२५ ही नियमावली तयार करून १९९६ चे नियम रद्द केले आहेत.

**आरक्षण वाटपाची नवी पद्धत**

२०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची लोकसंख्या ज्या गटात-गणात सर्वाधिक आहे, त्या जागांपासून उतरत्या क्रमाने आरक्षण दिले जाणार आहे. या पद्धतीनुसारच २०२५ पासून पुढील सर्व जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी आरक्षण सोडत केली जाईल. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर

मागासवर्गीय यांच्यासाठी ठराविक जागा आरक्षित राहतील. ओबीसी आरक्षणासाठी ज्या गटात-गणात यापूर्वी आरक्षण झालेले नाही, अशा ठिकाणांहून फिरत्या पद्धतीने जागा राखीव ठेवण्यात येतील. आरक्षणात महिलांसाठी ५० टक्के तरतूद पूर्ववत लागू राहणार आहे.

**आयोग ठरवणार अंतिम संख्या**

अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवार व महिलांसाठी किती जागा राखीव असाव्यात याची अंतिम संख्या राज्य निवडणूक आयोग निश्चित करणार आहे. यामुळे यापूर्वीच्या निवडणुकीतील आरक्षणाचा आधार घेऊन गट-गणात तयारी करणाऱ्या उमेदवारांची फसगत होऊ शकते. त्यामुळे उमेदवारांनी नव्या नियमावलीनुसार व २०११ च्या जनगणनेनुसार ठरलेल्या उतरत्या क्रमाच्या आधारेच निवडणूक लढवण्याची तयारी करावी, असा सूचक इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## शेतकऱ्यावरील दुर्दैवी घटनानंतरही सिडकोत भाजपच्या वतीने दहीहंडी उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड ,दि. २४ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्य सह नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यावर दुर्दैवी दुःखाच्या घटना घडल्या यामध्ये जीवित व आर्थिकहानी मोठ्या प्रमाणात होऊन या दुर्दैवी घटनेत मोठ्या प्रमाणावर गुरे ढोरे मृत्युमुखी पडले हा दुःखद घटना डोळ्यासमोर असतानाही सिडकोत भाजपच्या वतीने दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला.

सिडको येथे गोकुळाष्टमीचे अवचित्य साधून दहीहंडी महोत्सवाचे आयोजन भाजपच्या वतीने दिनांक २२ ऑगस्ट रोजी हडको येथे नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या उपस्थितीत पारपडला.

यावेळी आमदार श्रीदया चव्हाण, डी.पी. सावंत, अमर राजूरकर, दिलीप कंदकुर्ते ,प्रवीण साले यांची उपस्थिती होती.या आयोजित दहीहंडी कार्यक्रमास परिसरातील एकुन ७ गोविंद पथकाने सहभाग नोंदवला होता. यातील जय बजरंग गोविंदा पथक चिखलवाडी यांनी प्रथम पारितोषक पटकावले.

सदरील दहीहंडीचे मुख्य आकर्षण गौतमी पाटील हे होते. गौतमी पाटील यांच्या नृत्याचा आनंद घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. पण महाराष्ट्र राज्यसह नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यावर व सामान्य जनतेवर दुःखाचा डोंगर कोसळला असतानाही भारतीय जनता पार्टीने दहीहंडीच्या निमित्ताने गौतमी पाटील यांच्या नृत्याचा आनंद घेतला. एकीकडे पूरग्रस्तांना मदतीच्या हाताची गरज आहे. दुसरीकडे सांस्कृतिक कार्यक्रम राबवून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी शक्ती प्रदर्शन होत असल्याची चर्चा कार्यक्रमानंतर नागरिकांमध्ये चालू होती. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शक्ती प्रदर्शनाची गरज नसून स्थानिक मतदारांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची गरज आहे अशी चर्चा येथील मतदार व ज्येष्ठ नागरिकांतून होत होती.

## दिलीप जयस्वाल यांचे निधन

**हदगाव** - येथील प्रतिष्ठित व्यापारी दिलीप भैय्या गंगाप्रसाद जयस्वाल यांचा मागील काही दिवसांपासून नागपूर येथे खाजगी रुग्णालयात उपचार चालू होते उपचारादरम्यान दि. २३ ऑगस्ट रोजी वयाच्या ६७ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातू असा मोठा परिवार आहे. यांच्या निधनाने हदगाव शहरासह तालुक्यात शोकाकाळ पसरली असुन हदगावात सर्व लहान- मोठ्या मध्ये भैय्या या नावाने परिचित होते. त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त होत आहे. दि. २४ ऑगस्ट दुपारी १ वाजता हिंदू स्मशानभूमी तामसा रोड हदगाव येथे अंत्यविधी पार पडला.

## नांदेड जिल्ह्यातुन लाखो मराठे करणार मुंबईकडे कुच

**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि. २४ ऑगस्ट -**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला खणखणीत इशारा देत २९ ऑगस्ट २०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण करण्याचे जाहीर केले आहे. या उपोषणास नांदेड जिल्ह्यातून लाखो मराठा बांधव जाणार असल्याची माहिती सकल मराठा सेवक श्याम पाटील वडजे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मुंबई येथील उपोषणाच्या अनुषंगाने संपूर्ण महाराष्ट्रात चावडी बैठका नियोजनाने जोर धरला असून प्रामुख्याने मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक गावात सर्कलमध्ये मोठ्या प्रमाणात चावडी बैठका आयोजित केल्या जात आहेत. तरुण, अबाल, वृद्ध, ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी चावडी बैठकीत सहभागी होत आहेत.

स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी नुकताच मागच्या आठवड्यात मराठवाडा दौरा केला. यावेळी त्यांनी २९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथील उपोषणाच्या अनुषंगाने आढावा घेतला. नांदेड जिल्ह्यातही १५ ऑगस्ट रोजी त्यांची आढावा बैठक पार पडली. आढावा बैठकीमध्ये प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून आपआपल्या भागातील चावडी बैठकांचा अहवाल घेऊन अनेक मराठा सेवकांनी जरांगे पाटलांच्या भेटी घेतल्या. नांदेड जिल्ह्यातील प्रतिसाद पाहून स्वतः जरांगे पाटील ही भारावून गेले. नांदेडकरांनी आजवर मला खंबीर अशी साथ दिली, त्याच अनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील मराठा सेवकांनी चावडी बैठका घेण्यामागे जोर लावला असून लाखो समाज बांधव दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजीच अंतरवाली सराटी येथे मुक्कामासाठी पोहंचणार असून जरांगे पाटील यांच्या समवेतच मुंबईच्या दिशेने निघणार आहेत.

नांदेड जिल्ह्यातील १६ ही तालुक्यातील उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता नांदेड जिल्ह्यातून जवळपास दोन लाखाच्या आसपास समाज बांधव जरांगे पाटील यांच्या समवेत मुंबईला जातील, असा आशावाद मराठा सेवक श्याम पाटील वडजे यांनी व्यक्त केला आहे.

## मुदखेड मध्ये काँग्रेसचा बैलपोळा शेतकऱ्यांसाठी नवचैतन्याचा सोहळा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड , दि. २४ ऑगस्ट -**

मुदखेड शहरात युवक काँग्रेसच्या वतीने गेल्या पंधरा वर्षापासून सुरू असलेली बैलपोळा परंपरा कायम सुरू ठेवत निवड समितीने सदृढ बैलांना पारितोषिक देऊन कृतज्ञता व्यक्त केल्याने सर्वधर्मसमभावाचा सोहळा शेतकऱ्यांसाठी नवचैतन्याचा ठरला आहे. शेतकऱ्यांसाठी तसेच शेतमजुरांसाठी बैलपोळा हा सण जिव्हाळ्याचा समजला जातो. काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मानेवर जीवाचे ओझे वाहत मोलाचा वाटा असणाऱ्या बैल राजासाठी कृतज्ञता सोहळा पार पडावा यासाठी युवक काँग्रेस पुढाकार घेत आले आहे.

यावर्षी युवक काँग्रेसचे गिरीश कोत्तावार, गजानन संबोड, सुरेश ढगे, सचिन चंद्रे, देविदास चंद्रे, गंगाधर राजेवाड, आकाश आरेवाड, सतीश उन्हाळे दर्शन जंगिलवाड, बाळू चंद्रे यांच्या टीमने पुढाकार घेऊन नियोजन केले होते. सुदृढ बैलजोडी साठी आकर्षक पारितोषिक ठेवण्यात आले होते. हनुमान मंदिरात सामूहिक पूजा विधि नंतर बैल प्रदर्शनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सदृढ बैल जोडीसाठी पंच कमिटी नेमण्यात

आली होती या कमिटीत गंगाधर राचेवाड, सदाशिव मोरे, बाबुराव मालगे, गोविंद चौदंते यांचा समावेश होता. पंच कमिटीने प्रथम, द्वितीय व तृतीय बैल जोडीची निवड केली. प्रथम येण्याचा बहुमान विलास चंद्रे यांच्या बैल जोडीला मिळाला आहे. द्वितीय पारितोषिक भुजंग फुले यांनी पटकाविले आहे. तृतीय पारितोषिक बाळू चंद्रे यांच्या बैल जोडीला मिळाले आहे. तर चौथे पारितोषिक गजानन चौधरी यांच्या बैल जोडीला मिळाला आहे. याशिवाय प्रोत्साहन पर बक्षिसे बहाल करण्यात आली.

हनुमान मंदिरात शहरातील शहरातील बैलजोडीचे सामूहिक विवाह सोहळा पार पडला यानंतर बक्षीस वितरणाचे आयोजन करण्यात आले होते. नायब तहसीलदार मारोती जगताप यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले यावेळी काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास गोडसे, माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोत्तावार, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे, माजी उपनगराध्यक्ष शेख करीम खॉ साब, शेख सादत, प्रा. संदीप देशमुख, कलीम शेठ कुरेशी, माजी नगरसेवक महावीर कंधारकर, माजी सैनिक सुनील चौदंते, मारुती गुंठे, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष मुजीब पठाण, शिवानंद देवके, ऋषिकेश चौदंते, अविनाश चौदंते, मोईन फूलवाले, बालाजी महादवाड,संजय काचावार, विदांत शेवटे, अनिल काचावार, लतीफ टेलर, आकाश सोनटक्के,नाना टाक,यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## माहूरात बैलजोडी सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण आणि बळीराजा सन्मान सोहळा उत्साहात

**तभा वृतसेवा**
**माहूर , दि. २४ ऑगस्ट -**

माहूरला दरवर्षीप्रमाणे यंदाही पोळ्याच्या निमित्ताने शेती मित्र, युवावर्ग व व्यापाऱ्यांच्या वतीने 'बैलजोडी सजावट स्पर्धा आणि बळीराजा सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला.२३ ऑगस्ट रोजी या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट सजावटीसाठी विजेते ठरलेल्या सहा बैलजोड्यांना बक्षीसाचे वितरण व त्यांच्या पालनपोषण कर्त्या शेतकऱ्यांचा सन्मान तहसीलदार अभिजीत जगताप, पो. नि. गणेश कराड, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर लाड, माजी उपनगराध्यक्षा शोभाताई महामुने, रुपेश जाधव, अर्जुन जाधव, प्रदीप पिंपरवार या मान्यवरांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

बैलपोळा हा सण शेतकऱ्यांसाठी बैलांच्या मेहनतीचा उत्सव आहे, ज्यामध्ये बैलांना सजवून त्यांचे कौतुक केले जाते. हा सण भारतीय कृषी संस्कृतीचा एक अविभाज्य भाग असून, ग्रामीण जीवनाशी

आणि शेतीशी जोडलेल्या परंपरांचे जतन करतो. आणि म्हणूनच बैलपोळा हा सण बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तर बैलांनी वर्षभर केलेल्या कामासाठी आणि शेतकऱ्यांच्या जीवनातील योगदानासाठी त्यांचे विशेष कौतुक म्हणून बैलपोळा सणाच्या पार्श्वभूमीवर येथील युवावर्ग व व्यापाऱ्यांच्या वतीने बैलजोडी सजावट स्पर्धा व बळीराजा सन्मान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ९००१रुपये,दुसरे बक्षीस ७००१रुपये,तिसरे बक्षीस ५००१रुपये,चौथे बक्षिस ३१०१ रुपये,पाचवे बक्षिस २१०१रुपये व सहावे बक्षीस ११००असे बक्षिसांचे स्वरूप होते. उत्कृष्ट बैलजोडीला बक्षीस व बळीराजाचा सन्मान करण्याचे हे चौथे वर्षे ठरले.

बैलपोळा साजरा करण्यामागे शेतकऱ्यांकडून वर्षभर शेतीत राबणाऱ्या आणि नांगरणी, पेरणीसारखी कामं करणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा प्रमुख उद्देश आहे. हा सण बैलांचा सन्मान असून, त्यांना आराम देण्यासाठी आणि त्यांच्या कष्टाचे कौतुक करण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी बैलांना सजवून त्यांची पूजा केली जाते आणि त्यांना खास जेवण दिले जाते, जे त्यांच्या मेहनतीचा उत्सव असतो. यादिवशी बैलांना सजवून त्यांचे कौतुक केले जाते.माहूर येथे याच उद्देशाने बैलजोडी सजावट स्पर्धा आयोजित करण्यात येते.

यंदाच्या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट सजावटीसाठी विजेते ठरलेल्या बैलजोड्यांमध्ये प्रथम बक्षिस श्री योगी कृषी केंद्र यांचे कडून दिनेश कमठेवाड यांना,द्वितीय बक्षीस न्यू सुखकर्ता कृषी केंद्र तर्फे ज्ञानेश्वर सवटे यांना, तृतीय बक्षिस न्यू मेघा कृषी केंद्र यांचे तर्फे अरुण बोरेकर यांना,चतुर्थ बक्षिस श्री जगदंब किराणा तर्फे किशोर देशपांडे यांना, पाचवे बक्षीस जय भवानी गणेश मंडळ बारीपूरा यांच्या कडून रितेश दातीर यांना, सहावे बक्षीस शिवश्रद्धा गणेश मंडळ यांच्या तर्फे मारोती दुधे यांना, तर प्रोत्साहनपर बक्षीस संतोष जयस्वाल व शिक्षक सुनील कांबळे तर्फे संजय पोपुलवार, शकील भाई,आनंदा कांबळे यांना देण्यात आले. तसेच शाल, श्रीफळ व ट्रॉफीची जबाबदारी योगेश राऊत यांनी तर संदेश कोडगीलवार व कैलाश राऊत यांनी टिफिन बॉक्सची जबाबदारी उचलली.

यावेळी शेषराव इंगोले, सुभाष दुधे, रामचरण वर्मा,प्रशांत लोणसने यांचेसह माहूर शहर व परिसरातील बळीराजा व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते. या कार्यक्रमासाठी सुरेश गिऱ्हे, संतोष गंदेवाड, संतोष जयस्वाल,अशोक उप्पलवाड, गजानन जयस्वाल,परेश देशपांडे, अशोक आचकूलवार, गजानन शेद्दलवार, आडेलू कन्नेवार,सुनील सूर्यवंशी,अजय पोपुलवार, राजु मार्गमवार यांनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सुनील कांबळे यांनी केले.